




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०३.०३.२०२६ | अंक नं. २७७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# शिर्डीच्या साईबाबांच्या विषयी व्हिडीओद्वारे पसरवली बदनामीकारक माहिती; महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा

नगर – शिर्डीच्या साईबाबांच्या विषयी २ युट्युब चॅनल वर्ब व्हिडीओद्वारे खोटी व बदनामीकारक माहिती पसरवण्यात आली असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे साई भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून या प्रकरणी साई संस्थान च्या फिर्यादी वरून संबंधित युट्युब चॅनल चालविणाऱ्या एका महिलेसह तिघांच्या विरोधात शिर्डी पोलिस ठाण्यात २ मार्च रोजी २ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष महादेव गाडीलकर (रा. श्री साईबाबा भक्त निवास, शिर्डी, ता. राहाता) यांनी शिर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हंटले आहे की, तेलगु भाषेतील युट्युब चॅनल शिवा शक्ती यावर २५ फेब्रुवारी पूर्वी श्री साई बाबा यांच्या विषयी आक्षेपार्ह व खोटी माहिती असलेले व्हिडीओ प्रसारित करण्यात आले आहेत. त्याद्वारे साईबाबांची बदनामी करण्यात आली. ही हे व्हिडीओ तेलगु भाषिक साई भक्त प्रमोद कुमार चंदा व इतरांच्या निदर्शनास आले.

त्यांनी त्या व्हिडीओ तील तेलगु भाषेतील माहितीचा इंग्रजी भाषेत अनुवाद करून व्हिडीओच्या लिंक व तो मजकूर साई संस्थानला पाठविला. तसेच याबाबत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. संस्थानने याबाबत तातडीने दखल घेत साई भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणाऱ्या शिवा शक्ती या तेलगु भाषेतील युट्युब चॅनलची चालक करुणकर सगुणा (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही) हिच्या विरुद्ध शिर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी बीएनएस कलम ३५२, ३५३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी फिर्याद भास्कर किल्ली नावाच्या युट्युब चॅनल चालविणारे भास्कर किल्ली व प्रवीण कुमार (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) यांच्या विरुद्ध देण्यात आली आहे. या चॅनल वरील व्हिडीओत एका तरुणीशी संवाद साधताना साईबाबांच्या विषयी चुकीची व बदनामीकारक माहिती देण्यात आल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून दोघा संबंधितांच्या विरुध्द पोलिसांनी बीएनएस कलम ३५२, ३५३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. काही विकृत लोक श्री साईबाबांच्या विषयी वारंवार चुकीची व बदनामीकारक माहिती पसरवत असल्याने साईभक्तांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



शहरात आज धुलीवंदनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सावेडी येथील श्रमिकनगर तसेच दातरंगे मळा येथील श्री एकदंत कॉलनी परिसरात बालगोपाळांनी रंगांची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला. (छाया – श्रीनिवास बुरगुल)

# ‘सर्वेक्षण आणि मूल्यांकना’नंतर शहरातील मालमत्ताधारकांना वाढीव कराच्या नोटिसा

## महानगरपालिकेविरोधात तीव्र नाराजी

नगर – अहिल्यानगर महापालिकेकडून शहरातील मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण व मूल्यांकन करण्यात आल्यानंतर अनेक नागरिकांना वाढीव कराच्या नोटिसा प्राप्त झाल्या आहेत. अचानक आलेल्या या नोटिसांमुळे सर्वसामान्य कुटुंबांमध्ये तीव्र नाराजी व चिंता व्यक्त होत आहे.

महापालिकेने घर, इमारती व जमिनींचे पुनर्मूल्यांकन करून सुधारित कर मूल्य निश्चित केले असून त्यासंदर्भातील नोटिसा नागरिकांना पाठविण्यात आल्या आहेत. या नोटिसा थेट वाढीव कर बिल नसून नवीन करयोग्य मूल्य दर्शविणाऱ्या आहेत. पुढील काळात याच मुल्याच्या आधारे अंतिम कर बिल आकारले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत आहे.



नगरकरांना वाढीव मालमत्ता कराच्या नोटिसा दिल्याबद्दल नगरसेवक योगीराज गाडे यांनी महापालिका आयुक्ताना निवेदन देऊन वाढीव मूल्यांकनास विरोध दर्शविला आहे.

नोटिसांमध्ये प्रामुख्याने मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकामातील वाढ, वापरातील बदल यांचा आधार घेऊन मूल्य वाढविण्यात आले आहे. परिणामी करयोग्य रक्कमही वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या खिशावर मोठा आर्थिक भार पडणार असून, महापालिकेने करवाढ करु नये, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

दरम्यान, काही नागरिक व राजकीय प्रतिनिधींनी या प्रक्रियेवर आक्षेप घेत नियमबाह्य व अपारदर्शक पद्धतीने मूल्यांकन केल्याचा आरोप केला आहे. योग्य प्रत्यक्ष सर्वेक्षण न करता वाढीव मूल्यांकन करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक योगीराज गाडे यांनी महापालिका आयुक्ताना निवेदन देऊन वाढीव मूल्यांकनास विरोध दर्शविला आहे. त्यानी म्हटले आहे, महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक ताणतणावाच्या परिस्थितीत नागरिकांवर अतिरिक्त करभार टाकणे अन्यायकारक आहे. महानगरपालिकेने प्रथम नियमित पाणीपुरवठा, चांगले रस्ते, स्वच्छता आणि गटार व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा सक्षमपणे उपलब्ध करून द्याव्यात. सुविधा अपुऱ्या असताना वाढीव मूल्यांकनाद्वारे कर वाढविणे म्हणजे सर्वसामान्य जनतेची आर्थिक लूट आहे. आम्ही हा अन्याय सहन करणार नाही.

### निवेदनातील मागण्या

वाढीव मूल्यांकनाच्या सर्व नोटिसा तात्काळ स्थगित कराव्यात, पूर्वीचे दर व मूल्यांकन कायम ठेवावे, नव्या मूल्यांकन प्रक्रियेची पारदर्शक चौकशी करावी, नागरिकांच्या हरकती ऐकण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशा मागण्या नगरसेवक योगीराज गाडे यांनी महापालिका आयुक्तांकडे केल्या आहेत.

### हा लढा राजकीय नाही : योगिराज गाडे

हा लढा कोणत्याही राजकीय हेतूने नसून सर्वसामान्यांच्या हितासाठी आहे. जनतेवर अन्याय होणार असेल तर मी शांत बसणार नाही. प्रत्येक घराचा प्रश्न माझ्यासाठी वैयक्तिक आहे, असे सांगत नागरिकांनी चुकीच्या मूल्यांकनाविरोधात हरकत नोंदवावी, असे आवाहन नगरसेवक गाडे यांनी केले आहे.









# पुजाऱ्याच्या नातवानेच फोडली मंदिरातील दानपेटी; घटना सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद

पारनेर – पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील प्रसिद्ध श्री कोरठण खंडोबा देवस्थान येथील मंदिरातील दानपेटी मंदिराच्या पुजाऱ्याच्या नातवाने फोडून त्यातील रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी देवस्थानच्या अध्यक्ष शालिनी अशोक घुले (वय ४५, रा. पिंपळगाव रोठा, ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अनिकेत विकास क्षिरसागर (रा. पिंपळगाव रोठा, ता. पारनेर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पिंपळगाव रोठा येथील प्रसिद्ध श्री कोरठण खंडोबा देवस्थान हे पारनेर तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे, या ठिकाणी भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. आलेले भाविक मनोभावे मंदिरातील दानपेटीत दान टाकत असतात.१० फेब्रुवारी रोजी सकाळी सदर मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम चोरीला गेल्याचे निदर्शनास आले होते. त्यानंतर देवस्थानच्या वतीने या चोरीची चौकशी करण्यात आली. मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले असता त्यात दानपेटी फोडणारा संशयित चोरटा दिसून आला होता.

त्यानंतर १ मार्च रोजी देवस्थान समितीच्या विश्वस्थांची या विषयावर महत्वाची बैठक झाली. या बैठकीत याबाबत पोलिस ठाण्यात फिर्याद देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार देवस्थानच्या अध्यक्ष शालिनी अशोक घुले यांनी २ मार्च रोजी पारनेर पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित आरोपी अनिकेत विकास क्षिरसागर (रा. पिंपळगाव रोठा, ता. पारनेर) याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. दानपेटी चोरणारा आरोपी हा मंदिराच्या पुजाऱ्याचा नातू असल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.




जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जमिनीच्या वादातून वृद्धाला बेदम मारहाण; गुन्हा दाखल

नगर – कल्याण रोड परिसरात जमिनीच्या वादातून एका ६४ वर्षीय सेवानिवृत्त व्यक्तीला काही जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना २ मार्च रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दगडू बाबाजी शेरकर (वय ६४, रा. महालक्ष्मी लॉन्स शेजारी, विद्या कॉलनी, कल्याण रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कल्याण रोडवरील जाधव पेट्रोल पंपामागील स्वतःच्या मालकीच्या जागेवर कंपाउंडसाठी खड्डे खोदण्याचे काम करत होते. त्यावेळी आरोपी आनंदा बाबुराव आढाव, राहुल आढाव व इतर काही जण तिथे आले. त्यांनी फिर्यादीशी हुज्जत घालून व गैरकायद्याची मंडळी जमवून त्यांना जमिनीवर पाडले.

आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत फिर्यादीच्या डोळ्याला व नाकावर गंभीर दुखापत केली. तसेच फिर्यादीचा मुलगा निलेश यालाही जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर फिर्यादीने कोतवाली पोलिसांत धाव घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# तिथीप्रमाणे ६ मार्च रोजीच्या शिवजयंती मिरवणुकीसाठी रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकास परवानगी देण्यात यावी

## शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – ६ मार्च रोजी तिथी प्रमाणे शिवजयंती मिरवणुकीन कालमर्यादा दोन तास शिथील करुन रात्री १२ वा. पर्यंत ध्वनीक्षेपकः मिरवणुकीस परवानगी देण्यात यावी असे शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शहर प्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गटनेते दत्तात्रय कावरे, विक्रम राठोड, दत्ता जाधव, परेश लोखंडे, काका शेळके, अरुण झेंडे, प्रताप गडाख आदी उपस्थित होते


६ मार्चला तिथीप्रमाणे शिवजयंती मिरवणुकी कालमर्यादा दोन तास शिथील करुन रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक मिरवणुकीस परवानगी देण्यात यावी, या मागणीचे निवेदन शिवसेनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी बोलताना संभाजी कदम म्हणाले कि ६ मार्च रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव असून नगर शहर शिवसेना सालाबाद प्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करणार आहे. मिरवणूकीसाठी इतर धार्मिक सणांना वाढवून दिलेल्या कालमर्यादनुसार दोन तास शिथील करुन रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक, पारंपारिक वाद्ये वाजविण्यास व मिरवणुकीस परवानगी देण्यात यावी.

ध्वनीप्रदुषण (नियंत्रण व नियमन) अधिनियम २००० चे नियम ५ (३) व शासन निर्णय क्र. ध्वनीप्र २०००/प्र.क्र.२४ ता.क्र. ३ (भाग ३) दि. ७ एप्रिल २००३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन परवानगी द्यावी. कृपया निवेदनाचे तात्काळ लेखी स्वरुपात देण्यात यावे

संदर्भ – १) शा.नि.क्र. ध्वनीप्र–२०००/प्र.क्र. २४/ तांक–६, दि. १६/८/२००० व दि. १५/६/२००१., २) उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठामध्ये दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र. (१) २०५६/२००३, (२) ७४/२००७७५, (३) ८५/२००७ व (४) १/२००९ मधील दि. २६/२/२००९ चे आदेश.

# श्रीगोंदा तालुक्यात 'महसूल समाधान शिबिरां'चे आयोजन

नगर – शासन निर्देशानुसार राज्यभर राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान टप्पा – १ अंतर्गत श्रीगोंदा तालुक्यात ७ मार्च ते १३ मे या कालावधीत मंडळस्तरावर एकदिवसीय शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. तालुक्यातील नागरिकांनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सचिन डोंगरे यांनी केले आहे.

सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न तत्काळ निकाली काढणे, तक्रारींचा सत्वर निपटारा करणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी या शिबिरांचे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे. ७ मार्च रोजी काष्टी मंडळासाठी राजयोग मंगल कार्यालय (काष्टी) येथे शिबिर होईल. यानंतर १६ मार्च रोजी चिंभळा मंडळासाठी श्री हंगेश्वर मंदिर (हंगेवाडी), २० मार्च रोजी पेडगाव मंडळासाठी दत्त मंदिर सभागृह (पेडगाव), २७ मार्च रोजी आढळगाव मंडळासाठी श्री सिद्धेश्वर देवस्थान (आढळगाव), २ एप्रिल रोजी बेलवंडी बु. मंडळासाठी श्री छत्रपती विद्यालय हॉल (बेलवंडी बु.), १० एप्रिल रोजी देवदैठण मंडळासाठी महादेव मंदिर (देवदैठण), १७ एप्रिल रोजी लोणी व्यंकनाथ मंडळासाठी जिजाई मंगल कार्यालय (लोणी व्यंकनाथ), २१ एप्रिल रोजी मांडवगण मंडळासाठी श्री संत सावतामाळी मंदिर सभागृह (मांडवगण) आणि २३ एप्रिल रोजी भानगाव मंडळासाठी श्री भानेश्वर (महादेव) मंदिर (भानगाव) येथे शिबिरे होणार आहेत. तसेच, ८ मे रोजी श्रीगोंदा मंडळासाठी तुळशीदास मंगल कार्यालय (श्रीगोंदा) येथे तर १३ मे रोजी कोळगाव मंडळासाठी सैनिक सांस्कृतिक भवन (वीर भवन), कोळगाव येथे शिबिर पार पडेल.

शिबिरात विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन, अर्ज स्वीकृती, तक्रारींचे निवारण तसेच प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी किंवा तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथे संपर्क साधावा, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# एसीने भरलेल्या कंटेनर चोरी करणारी टोळी जेरबंद; ३५ लाख रुपयांचे बॉक्स जप्त

## सुपा पोलिसांची धाराशिवमध्ये कारवाई

नगर – पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसीतील म्हसणे फाटा येथील करिअर मायडिया इंडिया कंपनीचा एसीने भरलेला कंटेनर चोरी करणाऱ्या टोळीला सुपा पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात सुमारे ३५ लाख रुपयांचे ३२१ एसी बॉक्स जप्त करण्यात आले असून कंटेनर व पिकअप वाहनहीताब्यातघेण्यात आले आहे.

७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास करिअर मायडिया इंडिया कंपनीतून ड्रायव्हर सर्जेराव दत्तू शिंदे (रा. जामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) हे कंटेनर (क्र. एमएच १२, पीक्यू ६०१०) मधून अंदाजे ४७ लाख ३९ हजार ४१४.५५ रुपये किमतीचे एसी घेऊन हैदराबाद येथे माल उतरविण्यासाठी निघाले होते. मात्र त्यांनी सदर कंटेनर हैदराबाद येथे न नेता कर्नाटक राज्यातील गुलबर्गा परिसरात नेऊन त्यातील एसी माल चोरी करून कंटेनर तेथील पेट्रोल पंपावर उभा करून फरार झाल्याची बाब उघडकीस आली होती.


सुपाएमआयडीसीतील करिअर मायडिया कंपनीतून एसीने भरलेला कंटेनर चोरी करणाऱ्या आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. समवेत सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी व पोलीस पथक.

याप्रकरणी फिर्यादी मनीष सतीश शर्मा (वय ३७, रा. खराडी, पुणे) यांच्या तक्रारी वरून सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर सुपा पोलिसांनी धाराशिव येथून तिघांना अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी, पोलीस उपनिरीक्षक मंगेश नागरगोजे, पोलीस नाईक सतीश बर्डे, पोलीस कॉन्स्टेबल मेघराज कोल्हे, दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडु, नितीन शिंदे तसेच धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे सुदर्शन कासार, शौकत पठाण, प्रकाश अवताडे, जावेद काझी, फरहान पठाण, रत्नदीप डोंगरे आणि नागनाथ गुरव यांनी केली.

### धाराशिवमधून तिघांना अटक

सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी तत्काळ पथक नेमून तपास सुरू केला. तपासा दरम्यान चोरीचा माल व आरोपी धाराशिव जिल्ह्यात असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे सुपा पोलीस पथकाने धाराशिव येथील स्थानिक गुन्हे शाखेला संपर्क केला. त्यानंतर सुपा पोलीस व धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी संयुक्तरित्या सापळा रचून तीन आरोपींना अटक केली. सोनू अशोक पठारे (वय २१, रा. गोलेगाव, ता. भूम, जि. धाराशिव), गंगाराम मुबाराव पवार (वय २१, रा. ढोकी, जयभवानीनगर, ता. धाराशिव), भिबीषण नाना काळे (वय २५, रा. डोकी, जयभवानीनगर, ता. धाराशिव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावेआहेत.

### पत्र्याच्या शेडमधून ३२१ एसी बॉक्स जप्त

आरोपींनी चौकशी दरम्यान कबुली देत कंटेनर मधील एसी बॉक्स पिकअप (क्र. एमएच ४२, एआर ०५०५) वाहनामधून नेत लक्ष्मण धनु पवार (रा.तेर, ता. जि. धाराशिव) यांच्या मोहतरवाडी शिवारातील पत्र्याच्या शेडमध्ये ठेवले असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्या शेडमधून ३२१ एसी बॉक्स (अंदाजे किंमत ३५ लाख रुपये) जप्त करण्यात आले. तसेच कंटेनर व मालवाहतुकीसाठी वापरलेली पिकअप गाडीही जप्त करण्यात आली आहे.

## सुनील भळगट यांचे संथाराव्रतात निधन



नगर – आडतेबाजार तापीदास गल्ली येथील सुनील वसंतलाल भळगट (वय ६०) यांचे ३ मार्च रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, बहीण असा परिवार आहे. ते निर्मला भळगट यांचे पती, शुभम भळगट यांचे वडील तर सुशील भळगट यांचे धाकटे बंधू होत.

## वसुधाबाई मानकर यांचे आकस्मिक निधन



नगर – मानकर गल्ली दिल्लीगेट येथील रहिवासी सौ. वसुधाबाई मानकर (वय ६६) यांचे ३ मार्च रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भिंगार गवळीवाडा येथील कमर्शियल झेरॉक्स दुकानाचे सुभाष मानकर यांच्या त्या पत्नी तर विनायक, तेजस, ऋषिकेश यांच्या मातोश्री होत.

## बाळासाहेब घोरपडे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील बाळासाहेब गजानन घोरपडे (वय ६५) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हरिकमल प्लाझा येथील कर सल्लागार, सर्टीफाईड ऑडिटर नितीन घोरपडे व सचिन घोरपडे यांचे वडील होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**बुधवार दि. ४/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**जितु गंगाराम नारंग परिवार,** शिवाजी चौक, सिव्हील हडको, बी.नं.५५५, ८७९६१००१०२

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**आझाद तरुण मंडळ,** चंदे बेकर्स शेजारी, जुनी वसंत टॉकीज रोड, श्री. शरद भापकर – ९६२३४७८४१३

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्री. अनिकेत, डॉ. प्राजक्ता, ध्रुवक झावरे**
एल.आय.सी. कॉलनी, प्रशांत बंगला, टिव्ही सेंटर जवळ, सावेडी रोड ९९७००८१९२३

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**पंचरंग युवक मंडळ ट्रस्ट एवम् श्री. राजेंद्र बोगा मित्र मंडळ,** पंचरंग गल्ली, तोफखाना

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जिल्ह्यात चणा/हरभरा हमीभावाने खरेदीसाठी १० केंद्रांवर ऑनलाइन नोंदणी

नगर – शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई यांच्या वतीने जिल्ह्यात चणा/हरभरा हमीभावाने खरेदी करण्यासाठी एकूण १० खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, संबंधित केंद्रांवर ऑनलाइन पद्धतीने शेतकरी नोंदणी १ ते ३१ मार्च या कालावधीत करण्यात येणार आहे. हंगाम २०२४–२५ करिता चणा हमीभाव प्रति क्विंटल ५ हजार ८७५ रुपये निश्चित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा मार्केटिंग अधिकारी बी. आर. पाटील यांनी दिली आहे.

### चणा/हरभरा खरेदीसाठी १० केंद्रांवर नोंदणी

चणा/हरभरा खरेदीसाठी जिल्ह्यातील खालील १० केंद्रांवर नोंदणी करण्यात येत आहे. यामध्ये शेवगाव तालुका सहकारी खरेदी विक्री संघ (शेवगाव), जय भगवान स्वयंरोजगार सहकारी संस्था, पाथर्डी (मार्केट यार्ड, पाथर्डी), श्रीदत्त पणन सहकारी संस्था, श्रीगोंदा (घारगाव), रियल ग्रो फार्म प्रोड्युसर कंपनी, श्रीगोंदा (घुटेवाडी), जय किसान फार्मर प्रोड्युसर कंपनी, श्रीगोंदा (मांडवगण), राहुरी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ (राहुरी), पारनेर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ (पारनेर), बहारदारबाद विविध कार्यकारी सोसायटी, कोपरगाव (रांजणगाव देशमुख), चैतन्य कानिफनाथ कृषी फळे प्रक्रिया सहकारी संस्था, जामखेड (खर्डा) व पुण्यश्लोक कृषी पणन प्रक्रिया सहकारी संस्था, जामखेड (पिंपरखेड) यांचा समावेश आहे.

सर्व खरेदी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार असून नोंदणीसाठी आधारकार्डची छायांकित प्रत, राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची प्रत (खाते क्रमांक हस्तलिखित नसलेली), चालू वर्षाचा ७/१२ व ८–अ उतारा, हरभरा पिकाची ऑनलाइन नोंद आणि चालू मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी चालू हंगामातील सर्वसाधारण सरासरी (FAQ) दर्जाचा चणा खरेदी केंद्रावर आणावा. एन.सी.सी.एफ. यांनी निर्धारित केलेल्या निर्देशानुसार चण्याची तपासणी करण्यात येणार आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे खरेदीसाठी बोलावण्यात येईल. एसएमएसमध्ये नमूद केलेल्या तारखेलाच शेतमाल केंद्रावर आणणे बंधनकारक राहील, असेही कळविण्यात आले आहे.

# स्वतः ला 'किंग' म्हणत सुपा एमआयडीसी परिसरात दहशत माजवणाऱ्यावर 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई

नगर – स्वतः ला 'किंग गौरव' म्हणणारा व सुपा एमआयडीसीत दहशत माजवणाऱ्या सराईत गुंडावर एमपीडीए कायद्याअंतर्गत एक वर्षाकरीता स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. गौरव हरिभाऊ घायाळ (रा.सुपा ता. पारनेर) असे या गुंडाचे नाव आहे.


सुपा एमआयडीसीत दहशत माजवणाऱ्या गुंडावर कारवाई करताना पोलिस ठाण्याचे पथक.

आरोपी गौरव घायाळ याच्यावर सुपा पोलिस ठाण्यात ९ आणि नगरच्या एमआयडीसी पोलिस ठाण्यात १ असे एकूण १० गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. घायाळ याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी सुपा पोलिस स्टेशन च्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरिष वमने यांचे मार्गदर्शनाखाली आरोपी गौरव घायाळ यांचे विरूद्ध पोलीस अधिक्षक यांचेकडे एमपीडीए प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

जिल्हाधिकारी यांचे आदेशाने वरील गुन्हेगारांला अहिल्यानगर जिल्ह्यातून नाशिक कारागृहात एमपीडीए अंतर्गत एक वर्षाकरीता स्थानबद्ध करण्यात आल्याचा आदेश सुपा पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्याने त्याला नगर जिल्ह्यातून एक वर्षाकरीता नाशिक कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. सदर आरोपी हा सुपा शहरात दहशत माजवित होता. त्यास आळा घालण्याकरीता त्यांचेवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली. तसेच अशा प्रकारे भविष्यात सुपा व म्हसणे फाटा एम आयडीसीत दहशत निर्माण केल्यास त्यांचेवर मोक्का व एमपीडीए अंतर्गत कारवाई केली जाईल. असा इशारा पो.नि. गडकरी यांनी दिला आहे.

सदरची कारवाई पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी, उपनिरीक्षक मंगेश नागरगोजे, परिविक्षाधीन उपनिरीक्षक स्नेहा शिवले, पोलिस अंमलदार युवराज गिरवले, कैलास इथापे, खंडु लाळगे, अशोक मरकड, राहुल गोरे, योगेश सातपुते, मेघराज कोल्हे, प्रशांत दिवटे, विकास गायकवाड, अमोल साळवे, भगवान वंजारी, कृष्णा साळवे, यांनी केली आहे.

# सार्वजनिक ठिकाणी धिंगाणा घालणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

नगर – शहरातील माणिक चौक परिसरात सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या तिघांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २ मार्च रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास चांद सुलताना हायस्कूलजवळ घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, इम्रानखान नजीर खान, अब्दुल माजिद सलीमबेग मिर्झा आणि मतिन सलीमबेग मिर्झा (सर्व रा. कमानी मस्जिद, माणिक चौक) हे तिघे सार्वजनिक ठिकाणी एकमेकांशी भांडण करत होते. त्यांच्या या कृत्यामुळे परिसरात गोंधळ उडाला आणि नागरिकांच्या शांततेचा भंग झाला. या प्रकाराबाबत पोलीस कॉन्स्टेबल सुरज दिलीप कदम यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी या तिन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १९४ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# घरातून खरेदीखतासह कागदपत्रांची चोरी

नगर – घरातील कपाटात ठेवलेले फ्लॅटचे खरेदी खत व इतर कागदपत्रांची अज्ञात व्यक्तीने चोरी करून त्यात खरेदी खतावरील मूळ साक्षीदारांची नावे बदलून दुसऱ्याच साक्षीदारांची नावे टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

याबाबत संतोष विठ्ठल बत्तीन (रा. सातभाई मळा दिल्ली गेट यांनी सह दुय्यम निबंधक यांच्या सह जिल्हा पोलिस अधिक्षक यांना निवेदन देवून याबाबत तक्रार केली आहे. सदर कागदपत्रांची चोरी करून त्यात फेरफार करणाऱ्यांची सखोल चौकशी करून कारवाई करत न्याय मिळवून द्यावा अशी मागणी संतोष बत्तीन व त्यांच्या पत्नी शीतल बत्तीन यांनी या निवेदनात केली आहे.

# सावेडी उपनगरात महानगरपालिकेचे विवाह नोंदणी कार्यालय सुरू करावे

## आयुक्त, महापौर व उपमहापौरांकडे नगरसेवक रेवननाथ पवार यांची निवेदनाद्वारे मागणी


सावेडी उपनगरात महापालिकेचे विवाह नोंदणी कार्यालय सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन महापौर, आयुक्त व उपमहापौरांकडे देताना नगरसेवक रेवननाथ पवार आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – शहराचा वेगाने होणारा विस्तार आणि उपनगरांमधील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सावेडी उपनगरात महापालिकेचे स्वतंत्र विवाह नोंदणी कार्यालय सुरू करण्याची मागणी नगरसेवक रेवननाथ पवार यांनी केली आहे. सध्या विवाह नोंदणीचे एकमेव कार्यालय जुने पालिकेच्या मुख्य इमारतीत असल्याने, तिथे मोठी गर्दी होत असून नागरिकांना दीर्घ काळ रांगेत उभे राहावे लागते.

रेवननाथ पवार म्हणाले, महापालिकेच्या जुन्या इमारतीतच विवाह नोंदणीचे एकमेव कार्यालय असल्याने उपनगरातील नागरिकांना लांबवरून प्रवास करून यावे लागते.

शहराचा विस्तार झपाट्याने होत असून सावेडी परिसरात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे नागरिकांना सोयीसाठी सावेडी उपनगरातील महापालिकेच्या प्रभाग कार्यालयात स्वतंत्र विवाह नोंदणी कार्यालय सुरू करण्यात यावे. या मागणीसाठी रेवननाथ पवार यांनी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी सादर केली.

या वेळी किरण निकम, सुरज चांदगुडे, सौरभ जरे, नवनाथ पवार, योगेश आजबे उपस्थित होते. निवेदनावर प्रतिक्रिया देताना महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांनी सकारात्मक भूमिका घेत सावेडी उपनगरात विवाह नोंदणी कार्यालय लवकरच सुरू केले जाईल, असे आश्वासन नगरसेवक रेवननाथ पवार यांना दिले.

# गृहिणी

## आरोग्य

### शरीर करा आतून मजबूत

हवामान बदलताना शरीराला आतून मजबुती देणं गरजेचं आहे. दररोज सकाळी आल्याचा चहा किंवा तुळशीचा काढा घेतल्याने घसा आणि फुफ्फुसांचे इन्फेक्शनपासून रक्षण होते. रात्री झोपताना कोमट दुधात चिमूटभर हळद टाकून प्या. यातील 'कर्क्यूमिन' अँटी-व्हायरल म्हणून काम करते. लसूण: लसणामध्ये 'लिसिन' असते, जे जंतूशी लढण्यास मदत करते. व्हायरल तापापासून वाचण्यासाठी व्हिटॅमिन-सी हा तुमचा सर्वात मोठा मित्र आहे. आहारात लिंबूपाणी, संत्री किंवा मोसंबीचा समावेश करा. फेब्रुवारीत आवळे सहज उपलब्ध असतात. आवळ्याचा रस किंवा मोरंबा तुमची प्रतिकारशक्ती झपाट्याने वाढवतो. थंडी कमी झाली की आपण पाणी पिणं कमी करतो, पण कोरड्या हवेमुळे शरीर डिहायड्रेट होऊ शकतं. दिवसभर शक्यतो कोमट पाणी प्या. यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर पडण्यास मदत होते. शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स संतुलित ठेवण्यासाठी आठवड्यातून दोनदा नारळ पाणी नक्की प्या. बाहेरचे हवामान अनिश्चित असताना काही गोष्टींपासून लांब राहणेच हिताचे आहे. फ्रीजमधील पाणी, कोल्ड ड्रिंक्स किंवा आइस्क्रीममुळे घसा लगेच खराब होऊ शकतो. या दिवसात बॅक्टेरियाची वाढ लवकर होते, त्यामुळे नेहमी ताजे आणि गरम अन्न खा. महत्त्वाच्या टिप्स काय करावे? काय टाळावे? गरम पाण्याचे वाफारे घ्या. रात्री उशिरा दही खाणे टाळा. आहारात गुळाचा वापर करा. तेलकट आणि जंक फूड कमी करा. ७-८ तास पुरेशी झोप घ्या.

## पाककला

### चविष्ट वडा पाव

**साहित्य** : लादीपाव, ४ मोठे बटाटे, ५ हिरव्या मिरच्या, एक चमचा आले लसूण पेस्ट, कोथिंबीर, लिंबू, तळण्यासाठी तेल,

फोडणीचं साहित्य - २ टिस्पून तेल, मोहरी, जिरे, चिमूटभर हिंग, हळद आवरणासाठी - १ कप चणाडाळीचं पिठ, आवश्यकतेनुसार पाणी, १/२ टिस्पून हळद, चवीपुरते मीठ, चिमूटभर खायचा सोडा

**कृती** : बटाटे शिजवून मॅश करुन घ्यावे. गॅसवर कढई ठेवून २ चमचे तेल गरम करुन मोहरी, जिरे, हिंग, हळद, बारीक चिरलेल्या मिरच्या, आलं -लसूण पेस्ट घालावी. नंतर त्यात बटाटा घालून मंद आचेवर परतून घ्यावे. मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करुन घ्यावं. शेवटी थोडा लिंबूरस घालावा. भाजी थंड होण्यासाठी ठेवावी. आवरणासाठी बेसनात मीठ, हळद, किंचित सोडा घालून भिजवून घ्यावे. थंड झाल्यावर मिश्रणाचे छोटे गोळे करावे. कढईमध्ये तेल तापून घ्यावं आणि भिजवलेल्या बेसन पिठात तयार गोळे बुडवून तेलात तळून घ्यावे. तळून झाल्यावर पाव मधोमध उभा कापून त्यामध्ये लसणाची लाल चटणी लावून आणि वडा ठेवून सर्व्ह करावे.

## वास्तू

### आर्थिक संतुलनासाठी

* तुम्ही कुठेही राहता, घरासमोर कार, कार्ट इत्यादी ठेवण्यासाठी गॅरेज किंवा खोली नसावी. त्यामुळे त्या घरात राहणाऱ्या लोकांचा आनंद कमी होतो आणि पैशाचा खर्चही वाढू लागतो.

* अशा परिस्थितीत तुमचे आर्थिक संतुलन बिघडणे साहजिक आहे ज्यामुळे तुम्हाला पैशाची कमतरता, चिंता आणि मानसिक तणाव इत्यादींना सामोरे जावे लागू शकते.

## सौंदर्य

केसातील कोंडा, कधी कधी 'थायरॉईड'ची समस्या, शरिरात रक्त अल्प असणे, कुपोषण ही केस गळण्याची काही प्रमुख कारणे असू शकतात. त्यामुळे त्यांवर योग्य ते उपचार त्वरित केले पाहिजेत.

## सल्ला

चहा करताना किसलेले आले शेवटी घातल्यास त्याचा स्वाद चहाला अधिक चांगला लागतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ४ मार्च २०२६

**अभ्यंगस्नान, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, पूर्वा ०७।३९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**वृषभ** : कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**मिथुन** : एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**सिंह** : आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कन्या** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**तूळ** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**वृश्चिक** : इतर लोकांना आपल्या स्वतः च्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**धनु** : कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**मकर** : आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कुंभ** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**मीन** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

# शब्दगंध क्र. ७३७९

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | | ५ | ६ |
| ७ | | ८ | | | ■ | ९ | |
| | ■ | १० | | | ■ | | ■ |
| ११ | १२ | | ■ | १३ | | | |
| ■ | | ■ | १४ | ■ | ■ | | ■ |
| १५ | | | | | १६ | ■ | १७ |
| १८ | | ■ | | ■ | १९ | २० | |
| २१ | | | ■ | २२ | | | |

**आडवे शब्द :-** १) वाचून; शिवाय ३) सतत; अविरत; निरंतर ७) नगर जिल्ह्यातील एक तालुका ९) मारल्याचे खूण; लांबट उठाणू १०) उसाचा कढविलेला घट्ट रस ११) पाणी पिण्याची मानसिक व शारीरिक स्थिती; तृष्णा १३) लक्ष्मीपती; विष्णू १५) उत्खननात सापडलेल्या पाच हजार वर्षापूर्वीच्या दोन शहरांपैकी एक १८) औषध (हिंदी, उर्दू) १९) विळखा; घेराव; वेढा २१) लेखणी; रक्कम; बाब २२) विविध सणांचे दिवस

**उभे शब्द :-** १) सुसंगत नसलेले २) एक विषारी साप ३) एकापेक्षा जास्त ४) माणसांतील श्रेष्ठ ५) गोमंतकातील एक प्रसिद्ध देवता ६) खालचा भाग; बूड ८) घर (हिंदी, उर्दू) १२) खबरबात; सद्यस्थिती १४) मजोरी; उन्मत्त १५) गणपतीला याचा नैवेद्य दाखवितात १६) तेल, राळ, मेण यांच्यापासून बनविलेला एक चिकट पदार्थ १७) मोठे भगदाड २०) एक पक्षी; पोपट; कीर; राघू

### शब्दगंध क्र. ७३७८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | पं | ग | ■ | ■ | सं | ता | प |
| व | ध | ■ | वि | भा | ग | ■ | र |
| जा | र | ण | मा | र | ण | ■ | व |
| र | व | ■ | न | ■ | क | वा | ड |
| ■ | डा | क | ■ | री | ■ | स्तू | ■ |
| स | ■ | रं | ग | त | ■ | ■ | पा |
| प | क | ड | ■ | भा | न | ग | ड |
| क | र | क | री | त | ■ | त | वा |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : चेहरा सुंदर असेल तर मन सुंदर असेलच असे कधीच गृहीत धरू नये.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### रात्री किती पाणी प्यावे? अथवा पाणी पिऊच नये?

तुम्हाला महित आहे का अति पाणी सेवनाने पण नुकसान होते. यामुळे किडनी आणि पोटाचे आजार देखील होऊ शकतात. वॉटर रिटेंशनमुळे पण वजन वाढते. अधिक पाणी किंवा शरीरातील वाचलेले पाणी शरीरातील इलेक्ट्रोलाइटचे बैलेंस बिघडवते. सोडियमला कमी करून मेंदूला आणि डोळ्यांच्या खाली सूज आणते. खासकरून रात्री किती पाणी सेवन केले पाहिजे तसेच, सेवन पण करावे की नाही करावे हे देखील जाणून घेणे गरजेचे आहे.

पाणी किती सेवन केले पाहिजे-

* तहान लागेल तेव्हाच पाणी सेवन केले पाहिजे.

* २४ तासात कमीत कमी २ लीटर पाणी सेवन केले पाहिजे.

* पर्याप्त पाण्याच्या सेवनाने याचा काही हिस्सा आपल्या मांसपेशी मध्ये स्टोर होतो. ज्यामुळे भविष्यात गरज पडल्यावर शरीरात याचा प्रयोग होईल ही शरीराची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे.

* जेवण झाल्यानंतर पाणी हे कधीच सेवन करू नका तसेच उभे राहून देखील पाणी सेवन करू नये, थंड पाण्याचे सेवन करू नये. तसेच खूप कमी किंवा खूप जास्त पाणी सेवन करू नये.

रात्री पाणी पिण्याचे नुकसान -

१. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, झोपण्यापूर्वी पाणी प्यायल्याने मूत्राशयाच्या समस्यांचा सामना करावा लागतो.

२. अतिप्रमाणात पाणी सेवन मूत्राशयाला अतिसक्रिय करू शकते आणि यामुळे संसर्ग होऊ शकते.

३. झोपण्यापूर्वी अति पाणी सेवनाने ह्रदयाचे विकार होण्याची शक्यता असते. कारण अति पाणी सेवनाने सारखे बाथरूमला जावे लागेल आणि जर एकदा झोप मोडली तर पहिल्या सारखी झोप येत नाही.

४. आशा स्थितीत बीपी वाढू शकते, स्ट्रेस होऊ शकतो, शुगर वाढू शकते ही सगळी कारण ह्रदयाच्या आजाराला जन्म देतात.

५. जर तुम्ही हार्ट, बीपी, डायबिटीज, किडनी, मूत्राशय किंवा ब्लडप्रेशर यांनी ग्रस्त आहात तर झोपण्यापूर्वी कधीच पाणी सेवन करू नका.

रात्री किती प्रमाणात पाणी सेवन केले पाहिजे - १. रात्री लवकर जेवण करावे तसेच झोपण्यापूर्वी २ तासांपूर्वी पाणी सेवन करावे.

२. याच बरोबर काही तज्ञांचे म्हणणे आहे की, झोपण्यापूर्वी जर तुम्ही अर्धाच ग्लास पाणी सेवन करत असाल तर याने शरीरात रक्ताचा पुरवठा सुचारु, रूपाने चालत राहतो जो तुम्हाला ह्रदय विकाराचा झटका येण्यापासून वाचवतो.

३. तसेच रात्रीचे जेवण झाल्यानंतर १ तासाने पाणी सेवन करून मग २ तासांनी झोपावे.

### लोभी सिंह

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका घनदाट जंगलात एक सिंह राहायचा. तो फार लोभी होता. त्याला कोणत्याच गोष्टीचे समाधान वाटायचे नाही. एकदा प्रखर उन्हाळा पडला. त्या दिवशी सिंहाला खूप भूक लागली. म्हणून तो इकडे तिकडे अन्न शोधू लागला. थोडा वेळ शोधल्यानंतर त्याला एक ससा सापडला, पण तो खूप लहान वाटल्याने तो खाण्याऐवजी त्याने तो सोडून दिला.

तसेच काही वेळ शोधल्यानंतर त्याला वाटेत एक हरीण सापडले, तो त्याचा पाठलाग करू लागला पण अन्न शोधत असल्याने सिंह खूप थकला होता आणि त्यामुळे तो हरीण पकडू शकला नाही. आता जेव्हा त्याला खायला काहीच मिळाले नाही तेव्हा त्याने पुन्हा त्या सशाला खाण्याचा विचार केला. पण जेव्हा तो त्याच ठिकाणी परत आला तेव्हा त्याला तिथे एकही ससा सापडला नाही कारण ससे तिथून निघून गेले होते. आता सिंह खूप दुःखी झाला आणि त्याला बरेच दिवस उपाशी राहावे लागले. आता त्याला समजले की, अति लोभामुळे आपल्याला भुकेले राहावे लागले.

तात्पर्य : अतिलोभ न करता थोडक्यात समाधानी रहाणे फायद्याचे ठरते.

## जीवन का अमृत (भाग १)



उन्नति करता देखकर खुश होता है।

आपको शब्द मिल चुका है। । कृपया अपना ध्यान सत्गुरु की ओर रखें। आप हर जरूरी सहायता और संरक्षण पाएँगे। सत्गुरु सदा नामलेवाओं के साथ है। वह उनमें से हर एक के अंतर में वास करता है। वह सदा उनकी सहायता करता है, ताकि वे अंतर में आयें और उससे आमने-सामने होकर मिलें। यदि बच्चा एक कदम ऊपर चढ़ता है, तो वह बच्चे को उठाने के लिए लाखों कदम नीचे आ जाता है। हम सभी प्रभु के बाग के मजदूर हैं। हम दूसरों की अच्छाइयों की कद्र करना सीखें। यह हर प्रकार से फायदेमंद होता है।

३६. दिव्य दया के प्रति गहरी कृतज़ता और जबरदस्त नम्रता से उसकी कृपा जागृत होती है। सत्गुरु सदा का साथी है, जो कि अपनी छत्रछाया में, आत्मा को शुद्ध आनंद के मंडलों में ले जाता है।

### दयालु सत्गुरू

३७. दयालु सत्गुरु आपका सबसे नज़दीकी और सदा का मित्र है और वह आपकी कृतज्ञता को हमेशा स्वीकार करता है। यह माँ की प्यार से भरी नज़र है, जो आँखों के जरिये बच्चे में प्रेम भर देती है, जबकि बच्चा स्थायी आनंद को पाने के लिए इसी प्रेम को वापिस लौटाता है। आपकी बढ़ती हुई ग्रहणशीलता एक शुभ लक्षण है, जो कि आने वाले समय में, सत्गुरु दया से, ज्यादा महान संभावनाओं का संकेत देती है।

३८. इस प्रकार प्रभु भेष बदलकर, एक आम इंसान की तरह घूमता है, बाहर से एक इंसान जैसा। उसे कोई नहीं पहचान सकता, सिवाय उसके जो अंतर में सत्गुरु से मिलता है। यह दिव्य विज्ञान के अनुसार ही है, यानि जो नियम प्रभु ने इंसान के इस्तेमाल के लिए बनाए हैं। बाहरी तौर से, अगर हम संत सत्गुरु को एक साधारण इंसान माने, तो हम उससे कोई फायदा नहीं उठा सकते। अगर हम उसे एक अलौकिक इंसान माने तो बहुत फायदा होगा। अगर हम उसे सर्वस्व मान लें, तो फायदा एक सच्चा और महान वरदान बन जाता है। जब शिष्य सत्गुरु से अंतर में मिलता है, तो सब कुछ पा जाता है।

३९. एक समर्थ सत्गुरु द्वारा दिए गए नाम सिद्ध (अभिमंत्रित) होते हैं। ये नाम देने वाले (सत्गुरु) की शक्ति का आह्वान करते हैं। सत्गुरु शरीर नहीं, बल्कि एक चुने हुए इंसानी ध्रुव पर काम करती क्राईस्ट-शक्ति (प्रभु-शक्ति) है। हर किसी द्वारा पाँच नामों के देने से या किताबों से याद करके उनका जाप करने से कोई फायदा नहीं होगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : पण माझ्याविषयी अनेक लोक विचार करत असतील तर त्या सगळ्यांचे विचार माझ्यापर्यंत पोहोचतील का ?

शिवानीदीदी विचार ही ऊर्जा आहे. ती प्रसारित होते. त्या ऊर्जेमागचा नेमका विचार कदाचित तुम्ही ग्रहण करू शकणार नाही पण त्याचे तरंग, स्पंदनं तुम्हाला जाणवतील. म्हणूनच योग्य विचार करा, कारण तुम्ही जेव्हा एखाद्याबद्दल विचार करता तेव्हा तो प्रसारित होऊन त्याच्यापर्यंत पोहोचणार आहे. त्या आधारावर तुमच्या नात्याची पायाभरणी होणार आहे.

तुमच्यासाठी जर कोणी नकारात्मक ऊर्जा निर्माण करत असेल तर ती नकारात्मकता तुमच्यापर्यंत पोहोचणार आहे. आता जर तुम्ही तुमचे विचार जाणीवपूर्वक निवडले नाहीत आणि 'विचार तर आपोआपच येत राहतात, ' असं समजत राहिलात तर तुम्ही स्वतःच त्यांच्यासाठी असेच विचार निर्माण करत राहाल. हाच परस्पर देवाण-घेवाणीचा नियम आहे. तुमची एखाद्याबद्दल असलेली नकारात्मक ऊर्जा जेव्हा त्याच्यापर्यंत पोहोचते तेव्हा त्याच्या भावना जास्त बळावतात. अशा सततच्या देवाण-घेवाणीमुळे मोठ्या प्रमाणात नकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि तीच त्या व्यक्तीबरोबरच्या तुमच्या नात्याचा पाया बनते.

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय : परंतु माझ्या मनात त्या व्यक्तीविषयी कोणतेही विचार नसताना ती व्यक्ती सुरुवातीलाच माझ्याबद्दल नकारात्मक विचार का करेल ?

शिवानीदीदी : तुमचं वर्तन चांगलं असूनही तुम च्याबद्दल वाईट विचार करण्यासाठी त्या व्यक्तीकडे तिची स्वतःची अशी काही कारणं असू शकतात. त्या व्यक्तीला

न्यूनगंड असू शकतो, असुरक्षिततेची भा५. असू शकते किंवा त्या व्यक्तीची प्रवृत्तीच टीका करण्याची असू शकते.

सुरेश ओबेरॉय : ऊर्जेच्या या देवाण-घेवाणीत अंतर किती प्रभाव पाडू शकतं? शिवानीदीदी : ऊर्जेची ही देवाण-घेवाण एस.एम.एस. सारखी आहे. तुम्ही अमेरिकेत असाल आणि दुसरी व्यक्ती भारतात... तरीही तुम्ही तिच्याबद्दल केलेला विचार तिच्यापर्यंत पोहोचणारच. इतर कोणीच तो ग्रहण करणार नाही. कारण तो फक्त त्या व्यक्तीबाबत केलेला विचार आहे. वेळ, काळ आणि अंतर ही परिमाणं ह्या देवाण-घेवाणीत लागू पडत नाहीत. विचारांच्या शक्तीमार्फत साधला जाणारा असा हा संवाद आहे. सुरेश ओबेरॉय : आपल्याला असं वाटतं की एखाद्याबद्दल खाजगीत कसाही विचार करून आपण लोकांमध्ये प्रसन्नतेने वावरू शकतो. पण हे शक्य नाहीये. शिवानीदीदी : मनाला वाटेल तसा विचार करण्याची मुभा आपण स्वतःला देतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : आज आपण बाहेर जेवू गं..

बायको : अय्या... लगेच तयारी करते मी.

नवरा : हो.. तू स्वयंपाक कर, मी अंगणात चटई टाकतो.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* MITRA हा डिजीटल प्लॅटफॉर्म कोणी लॉन्च केला आहे?

- SEBI

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कलिंगड

८) कलिंगडामध्ये टोमॅटोप्रमाणे लायकोपिनचे प्रमाण भरपूर असते. लायकोपिन अँटीऑक्सिडंट ठरते. ठेवायला उपयुक्त असल्यामुळे कर्करोग दूर

९) कलिंगड खाल्ल्याने त्यामध्ये असणारा चोथा व आर्द्रतेमुळे मलावरोधाची तक्रार कमी होऊन पोट साफ होते.

१०) उष्माघातामुळे शरीराची आग होत असेल तर तसेच उष्णतेमुळे डोळ्यांची, तळपायांची आग होत असेल, तर कापलेल्या टरबुजाची साल त्या भागावर ठेवावी. थोड्याच वेळात शरीराची आग कमी होते.

११) सौंदर्यवर्धनासाठी देखील कलिंगडाचा उपयोग होतो. कलिंगडाची साल चेहऱ्यावर चोळल्याने चेहऱ्याची चकाकी वाढते.

१२) कलिंगडाचे बी हे अतिशय पौष्टिक व चवदार असते. मुखशुद्धीसाठी बडिशेपमध्ये कलिंगडाचे बी वापरावे. तसेच घरी बनविलेले लाडू, बर्फी, केळे यामध्येही या बीचा सजावटीसाठी वापर करावा. या बीपासून तयार केलेले तेल पौष्टिक असते. त्याचाही खाद्यपदार्थ म्हणून वापर करता येतो. थोडे पाणी घालून मिक्सरमध्ये कलिंगडाचे बी टणक असल्यामुळे सोलायला कठीण असते. म्हणून बी बारीक करावे. त्याचा रस गाळणीतून गाळून घ्यावा. हे गाळलेले पांढरे दूध रश्शाच्या भाजीत किंवा आमटीत घालावे. या बियांमध्ये प्रथिने, क्षार, शरीरास उपयुक्त असा मेद भरपूर प्रमाणात असतात. त्याचा आरोग्य चांगले राहण्यासाठी उपयोग होतो.

१४) कलिंगडाचा लाल गर काढल्यानंतर, सालीचा पांढरा गर फेकून न देता त्याचा वापर कोशिंबीर, थालीपीठ, कटलेट, भजी, धिरडे, भाजी यांसाठी करावा.

१५) कलिंगडाची हिरवी साल स्वच्छ धुऊन बारीक किसून सांडगे बनविण्यासाठी वापरावी यामध्ये लोह, चोथा व ब जीवनसत्त्व विपुल प्रमाणात असते. येतो.

अशाप्रकारे कलिंगडाचा कोणताच भाग फेकून न देता त्याचा आपल्या आरोग्यासाठी वापर करता

सावधानता :

कलिंगड हे फळ पिकल्यानंतर माठाखाली ठेवावे व त्यावर पाण्यामध्ये बुडविलेले थंड कापड टाकावे व त्यानंतर चार ते पाच तासांनी कलिंगड खावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




अरणगाव येथे श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ संचलित मानवसेवा प्रकल्पांतर्गत बेघर, निराधार व पीडित मनोरुग्णांच्या उपचार व पुनर्वसनासाठी उभारण्यात आलेल्या नव्या इमारतीचे लोकार्पण पार पडले.

# बेघर, निराधार व पीडित मनोरुग्णांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी उभारलेल्या नव्या इमारतीचे लोकार्पण

नगर – अरणगाव येथे श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ संचलित मानवसेवा प्रकल्पांतर्गत बेघर, निराधार व पीडित मनोरुग्णांच्या उपचार व पुनर्वसनासाठी उभारण्यात आलेल्या नव्या इमारतीचे लोकार्पण उत्साहात पार पडले. या नव्या वास्तूमुळे संस्थेच्या समाजकार्याला नवे बळ मिळणार असून निराधार घटकांसाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे. इमारतीचे उद्‌घाटन रमणलाल लुंकड, ज्येष्ठ समाजसेवक सुवालाल शिंगवी तसेच सुजन बिंदू यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास अमरलाल दर्डा, राजू दळवी, नाना भोरे, संतोष धुमाळ, जिल्हा बालसंरक्षण कक्षाचे प्रशांत गायकवाड, सराफ व्यावसायिक संजय शिंगवी, संस्थेचे संस्थापक दिलीप गुंजाळ, उपाध्यक्षा शारदा होशिंग, अविनाश मुंडके, संजय गटागट, माजी अध्यक्षा मिरा जाधव, आकाश लुंकड, लौकिक शिंगवी, गुंजन शिंगवी, डॉ. सुरेश घोलप, विजयकुमार कटारिया, तुलशीकुमारी कोका आदी उपस्थित होते.

इमारतीच्या बांधकामासाठी भामाशाह रमणलाल लुंकड व लुकड परिवार, प्रियंका आणि जयंत गुलवडी (ऑस्ट्रेलिया), डॉ. विजय सोनार, अजय अमरलाल दर्डा, तुलसी कुमारी कोका, ब्रिटीश संगीत निर्माता सुजन बिदु, भारतीय ब्रिटीश गायक संगीतकार बिदु अपाइच तसेच रेलफॉर फाऊंडेशन (पुणे) चे दिपकजी नाथानी यांनी उदार अर्थसहाय्य केले आहे. त्यांच्या सहकार्यामुळे ही सुसज्ज इमारत उभी राहू शकली.

आकाश लुंकड म्हणाले की, बेघर, निराधार व पीडित मनोरुग्णांसाठी संस्थेने सुरू केलेले कार्य अत्यंत महान आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांना आधार देण्याचे हे पवित्र कार्य आहे. या नव्या इमारतीमुळे अधिक सुसज्ज सुविधा उपलब्ध होतील आणि उपचार व पुनर्वसन प्रक्रियेला गती मिळेल. समाजातील प्रत्येकाने या कार्यात हातभार लावावा.

दिलीप गुंजाळ यांनी संस्था स्थापनेमागील प्रेरणादायी घटना सांगताना उपस्थितांना भावूक केले. त्यांनी सांगितले की, रस्त्यावर असहाय अवस्थेत बसलेल्या एका मातेचे आणि तिच्या आजारी बालकाचे दुःखद चित्र पाहून माझे मन हेलावले. त्या क्षणी निराधारांसाठी काहीतरी करण्याचा निर्धार केला. आज या प्रकल्पाच्या माध्यमातून अनेकांना आधार देता येतो, हीच माझ्यासाठी खरी समाधानाची बाब आहे. मानवसेवा हा केवळ प्रकल्प नसून ती माझी जीवनप्रतिज्ञा आहे.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेतील लाभार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. प्रास्ताविक शारदा होशिंग यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे स्वयंसेवक सिराज शेख, अंबादास गुंजाळ, सोमनाथ बर्डे, अर्चना गुंजाळ, सायली टेकम, ऋतिक बर्डे, मथूरा जाधव, प्रसाद माळी, बाळासाहेब घुंगरे, शोभा दुधवडे, मच्छींद्र दुधवडे, मंगेश थोरात, गोरख धात्रक, मयुरी वनवे, सागर विटकर, तन्वी देशमुख, मनिश राऊत, श्रीकांत शिरसाठ, अविनाश पिंपळे, अजय दळवी, स्वप्नील मधे, राहुल साबळे, पुनम खाडे, निकिता बर्डे व सुरेखा जाधव यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वृंदावनी वेणू

“मुसाफिर”
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

भारतीय संस्कृतीने आणि लोकजीवनाने संगीताला केवळ कला म्हणून स्वीकारले नाही तर नादब्रह्माची अनुभूती म्हणून संगीताला गौरविले. संगीतामध्ये गाणारा एवढा एकरूप होतो की स्वतःला विसरतो. ऐकणाराही ऐकताना इतका एकरूप होतो की तोही मैफलीत स्वतःला विसरतो. स्वतःला आणि देहाला विसरणे हीच समाधी असते.

तर दोघांनी एकरूप होऊन नादसमाधीची अनुभूती घेणे हेच एक अद्वैत असते. अद्वैतात गेलेले स्वर द्वैतात येऊन नाचू लागतात आणि स्वरमहोत्सव रंगतो. ज्ञानपीठ पुरस्कारविजेते ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर यांना भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या गाण्याविषयी लिहिलेल्या चार ओळी खूप काही सांगून जातात.

अमृताचे डोही बुडविले तुम्ही ।
बुडताना आम्ही धन्य झालो
मी पण संपले झालो विश्वाकार
स्वरात ओंकार भेटला गा।

स्वरामागचा राग ही संगीताची अनुभूती पण स्वरातला ओंकार ही आत्म्याची अनुभूती होय. संगीत हे आत्म्याच्या अभिव्यक्तिचे माध्यम आहे. विंदा करंदीकरांसारखे शब्दप्रभू आणि पंडित भीमसेनजींसारखे स्वरभास्कर जेव्हा एकमेकांशी असा संवाद करतात तेव्हा शब्दातून स्वर आणि स्वरातून शब्द एकमेकांना साद घालत असतात. स्वरातच ओंकार भेटतो. भगवान श्रीकृष्णाने बासरीवादनाने वज्रवासीयांना साद घातली. वृंदावन आणि वेणू हे श्रीकृष्णाचे विश्रांतीस्थान तर भक्तांचे आनंदधाम.

वृंदावन सम्प्रविश्य सर्वकालसुखावहम्

असे म्हणत गोप, गोपी, गायी, गुरे व्रजवासीयांसह श्रीकृष्ण गोकुळातून वृंदावनात आला. तिथेच गोपगड्यांचे खेळ रंगले आणि श्रीकृष्णाची बासरी घुमली. वेणूवादनाने वृंदावन आनंदले.

वृंदावनी वेणू।
वेणू कवणाचा माये वाजे ।
वेणूनादे गोवर्धन गाजे।

सारे वृंदावन स्वतःला विसरून वेणूनादात एकरूप झाले. पशू–पक्ष्यी, पांगुळलेले यमुनाजळ, मुरलीचा ध्वनी ऐकताच विव्हळ झालेले अंतःकरण वेणूनादाने गौळणींनी विसरलेला घरधंदा, हरपलेले देहभान आणि गोपींच्या वृत्तीची एकरूपता हे सारे वर्णन ऐकले की संगीत हे परमेश्वराच्या जवळ कसे नेते आणि नादब्रह्म स्वरातील ओंकाराला कसे भेटते हे वेगळे सांगायला नको.

– किशोर गांधी

# राज्यस्तरीय स्वतंत्र तबला वादन स्पर्धेत जय गांधीला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक




राज्यस्तरीय स्पर्धेत स्वतंत्र तबला वादन मध्ये जय संजय गांधी याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

नगर – शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन व आय लव्ह नगर प्रायोजित आणि अनाहत एक कलासृष्टी आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत स्वतंत्र तबला वादन मध्ये जय संजय गांधी याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. नरेंद्र फिरोदिया व गुरू शेखर दरवडे यांच्या हस्ते जय संजय गांधी याचा ११ हजार रुपये रोख आणि ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी अशोक गांधी (जरीवाला), अनाहतचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी, विलास बडवे, डॉ. निरज करंदीकर, परीक्षक सुजित काळे (नाशिक), प्रशांत गाजरे (नांदेड) आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत लातूर, अंबरनाथ, बारामती, पनवेल, नांदेड, रायगडसह राज्यातील स्पर्धक सहभागी झाले होते. स्वतंत्र तबला वादन मध्ये गांधी याने १२ मिनिटे सुंदर वादन केले. त्याने यापूर्वीही विविध स्पर्धेत उत्कृष्ट तबला वादनासाठी बक्षिसे मिळवली आहेत. जयने विशारद पूर्ण केले आहे. सध्या तो सोलो व साथ संगतचा अभ्यास व सराव करत आहे. जय हा संजय गांधी (वाळवणेकर) यांचा मुलगा तर तबला वादक अजित गुंदेचा यांचा भाचा आहे.

# सुधीर दत्तात्रय फडके लिखित ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ पुस्तकाचे प्रकाशन




सुधीर दत्तात्रय फडके लिखित ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ पुस्तकाचे प्रकाशन करताना वेदमूर्ती सिद्धेश्वर निसळ गुरुजी, प्रवचनकार ज्ञानकुमार झंवर आदी.

नगर – शिवतत्त्वाच्या सखोल विवेचनावर आधारित ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे झाला.

कार्यक्रमाची सुरुवात महादेवाच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून सोहळ्याची औपचारिक सुरुवात झाली. शिवमहापुराण कथा व निरूपणकार तसेच रामकृष्ण मठ, बेलूर येथील उपाध्यक्ष गहनानंद महाराज यांच्याकडून गुरुदीक्षा प्राप्त शेखर गाडगे (उर्फ बाळ गाडगे, नागपूर) यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी आध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक उपस्थित होते. वेदमूर्ती सिद्धेश्वर निसळ गुरुजी, प्रवचनकार ज्ञानकुमार झंवर, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष के. डी. खानदेशी तसेच नगरसेविका सौ. गीतांजली काळे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. नंदकुमार पोळ यांचाही यावेळी लेखकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पुस्तकाचे प्रकाशक अरुण झंवर तसेच पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ तयार करणारे उदावंत पिता–पुत्र यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वातीताई रानडे यांनी केले. प्रारंभीची प्रार्थना व समारोपाचे पसायदान सारिकाताई ओगले यांनी सादर केले.

लेखक सुधीर दत्तात्रय फडके यांनी मनोगतात सांगितले की, ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ हे पुस्तक वाचकांना शिवतत्त्वाचा गूढ आणि व्यापक अर्थ समजावून देण्याचा प्रयत्न आहे. समाजात अध्यात्मिक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने हा ग्रंथ साकारल्याचे त्यांनी नमूद केले.

लेखक सुधीर दत्तात्रय फडके हे जिल्हा परिषदेमध्ये विस्तार अधिकारी (कृषी) या पदावरून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या कृषी विषयक एका पुस्तकास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार प्राप्त झाला असून विविध सामाजिक संस्थांकडून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी पुस्तकातील शिवतत्त्वाचे अभ्यासपूर्ण व सखोल विवेचनाचे विशेष कौतुक केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे ४ ते ३० मार्च दरम्यान मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन

### अँजिओग्राफी ३ हजार, एमआरआय २५०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपयात, सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मार्च मध्ये महिनाभर विविध मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ४ ते ३० मार्च या कालावधीत सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत हे शिबिरे होतील. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे यंदा रौप्य महोत्सवी वर्षे आहे. हॉस्पिटलला एन.ए.बी.एच.मान्यता मिळालेली असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमध्ये जागतिक दर्जाच्या सिमेन्स कंपनीचे एमआरआय १.५ टेस्ला मशीनव्दारे तपासणी २५०० रुपये, सिमेन्स ९६ स्लाईस सिटी स्कॅन मशीनव्दारे तपासणी १२५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, डिजीटल एक्स रे तपासणी २५० रुपयात उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन कक्ष, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

४ मार्च रोजी स्त्रीरोग व गर्भवती माता तपासणी शिबीर होईल. यात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भ पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये पॅकेज, सिझेरियन १० हजार रुपयात केले जाईल. शिबिरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्या ५० टक्के सवलतीत केल्या जातील. शिबिरापासून पुढे एक महिना या सवलतीचा लाभ मिळेल. शिबिरात सहभागी होणाऱ्या महिलांना बाळंतपणावेळी बिलात ५० टक्के सवलत दिली जाईल. यासाठी सवलत कार्ड असणे आवश्यक आहे. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ. सोनल बोरुडे, डॉ.कृतिका पाटील रूग्ण तपासणी करतील.

५ मार्च रोजी सवलतीच्या दरात जनरल सर्जरी शिबीर होईल. यात अ‍ॅपेंडिक्स इंटरव्हल, इंगवायनल हर्निया शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपये, हायड्रोसिल शस्त्रक्रिया ४ हजार रुपयांत केली जाईल. औषध खर्च वेगळा असेल. जनरल सर्जन डॉ. प्रविण मुनोत, डॉ.विवेक भापकर रूग्ण तपासणी करतील.

८ मार्च रोजी कॅन्सर तपासणी शिबीर होईल. यात घसा, फुफ्फुस, आतडे, तोंड इ. कॅन्सर तपासणी होईल. स्त्रियांचे कॅन्सर तपासणी अंतर्गत मॅमोग्राफी मशीनव्दारे स्त्रियांच्या स्तनांची कॅन्सर तपासणी होईल. गर्भ पिशवीच्या कॅन्सर तपासणी व निदानासाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी करण्यात येईल. ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटिव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटिक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ.सुविधा अल्प दरात उपलब्ध आहेत. मॅमोग्राफी तपासणी १०० रुपयात केली जाईल. कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे, कॅन्सर फिजिशियन डॉ.तुषार मुळे, कॅन्सर विकार तज्ज्ञ डॉ. लिझा बलसारा, फिजिशियन डॉ. गजेंद्र गिरी, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरूडे, रेडिओलॉजीस्ट डॉ.मितेश कटारिया, डॉ.भक्ती फलके, डॉ.सोनाली सोलट, डॉ.निखिता जैन–कटारिया, पॅथोलॉजीस्ट डॉ. मुकुंद उंडे, डॉ.सारिका झरेकर, मायक्रोबायोलॉजीस्ट डॉ.नरेंद्र पाटील रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.



११ मार्च रोजी त्वचारोग तपासणी शिबीर होईल. यात त्वचा लर्जी, पांढऱ्या डागावरील उपचार, इसब, गजकर्ण, नायटा, केस, नखांच्या समस्या, सोरायसीस, चामखीळ, मसवरील उपचार, कुष्ठरोग इ. तपासणी व उपचार केले जातील. त्वचारोग तज्ज्ञ डॉ.विजया एरंडे रूग्ण तपासणी करतील.

१३ मार्च रोजी ब्लड प्रेशर, मधुमेह व इतर आजार तपासणी व निदान शिबीर होणार आहे. यात साथीचे आजार व सर्व रोग निदान तपासणी करण्यात येईल. एम.डी.मेडीसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.प्राजक्ता पारधे, डॉ.स्वप्निल शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

१४ मार्च रोजी एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया शिबीर होईल. यात प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, महिलांचे मूत्र मूल्यमापन व व्यवस्थापन, मूत्र मार्गातील विकार, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन इ. तपासणी होईल. प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातील. मूत्रविकार शल्यचिकित्सक डॉ.संकेत काळपांडे, डॉ.अमेय सांगळे, डॉ.स्वनित देशपांडे रूग्ण तपासणी करतील.

१५ मार्च रोजी हृदयरोग तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबीर होईल. बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया केल्या जातील. अँजिओप्लास्टी व सर्व शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत केल्या जातील. अँजिओग्राफी ३ हजार रुपयांत केली जाईल. कार्डियाक सर्जन डॉ. स्वप्निल कर्णे, डॉ.श्रीरंग रानडे, डॉ.इम्रान पटेल, डॉ.देखणे, डॉ.अगस्थी, एम.डी.मेडिसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.विनोद चिंधे, कार्डिओलॉजीस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ.अमित थोपटे, डॉ.विनोद चिंधे, डॉ.अनिकेत कटारिया, कार्डियाक नेस्थेटिस्ट डॉ. विनय छल्लाणी, एमडी मेडिसीन डॉ.गजेंद्र गिरी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ.स्वप्निल शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

१६ मार्च रोजी किडनी आजार तपासणी शिबीर होईल. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी होणे, लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस इ.उपचार केले जातील. किडनी ट्रान्सप्लांट मार्गदर्शन करण्यात येईल. प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. नेफ्रोलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट, फिजिशियन डॉ.प्राजक्ता पारधे रूग्ण तपासणी करतील.

१७ मार्च रोजी मेंदू विकार तपासणी शिबीर होईल. डोकेदुखी, अपस्मार, पक्षाघात, कंबर दुखी, नसांचे विकार, स्नायूंचे विकार, मेंदू जंतु संसर्ग, मेंदू ज्वर, स्मृतीभ्रंश इ.आजारांची तपासणी होईल. ईईजी, ईएमजी, एनसीव्ही इ.तपासण्या ५० सवलतीच्या दरात केल्या जातील. मेंदू, मणके, मज्जारज्जू संबंधित आजार तपासणी, ट्रॉमा सर्जरी, मेंदूतील रक्तस्त्राव, स्लीपडिक्स (मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे इत्यादीवर उपचार व शस्त्रक्रिया), लहान मुलांमधील फिट, मेंदू विकार, मतिमंदता, गतिमंदता, स्वमग्नता, आनुवांशिकता, अतिचंचलपणा इ.आजारांची तपासणी करण्यात येईल. न्यूरोलॉजीस्ट डॉ.अव्दैत गिते, डॉ.वैशाली कदम, लहान मुलांचे मेंदू विकार तज्ज्ञ डॉ.स्नेहा म्हस्के रूग्ण तपासणी करणार आहेत.

१८ मार्च रोजी प्लॅस्टिक सर्जरी शिबीर होईल. लहान मुलांच्या जन्मजात हातांच्या समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुन्या जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नस संबंधित आजार, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण इ. उपचार, तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, मान, सायनस, लाल ग्रंथीच्या साध्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार, तोंडातील लाल, पांढरे चट्टे, तिखट व मसालेदार खाण्यातील अडचणी, तोंडाचे व्रण इ. उपचार मार्गदर्शन केले जाईल. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. प्लॅस्टिक सर्जन डॉ.आदित्य दमानी, डॉ.मृदुला मुळे रूग्ण तपासणी करतील.

२० मार्च रोजी श्वसनविकार तपासणी शिबीर होईल. फुफ्फुसाचे आजार, दमा, खोकला, अ‍ॅलर्जी इत्यादीवर उपचार केले जातील. श्वसन विकार तज्ज्ञ डॉ.स्नेहा तिरपुडे, डॉ.प्रणाली त्रिमुखे रूग्ण तपासणी करतील.

२४ मार्च रोजी अस्थिरोग तपासणी, मणके, सांधेबदली शस्त्रक्रिया व फिजिओथेरपी शिबीर होईल. संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण (गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह) प्रत्येकी ६५ हजार रुपये पासून पुढील दरात होईल. औषध खर्च वेगळा असेल. गुडघेदुखी (टिकेआर पुनर्वसन), संपूर्ण गुडघा रिप्लेसमेंट रिहॅबिलिटेशन, फ्रोजन शोल्डर, मानदुखी, पाठ दुखी, फ्रॅक्चर नंतरचे पुनर्वसन, बेल्स पाल्सी व चेहऱ्याचा कमकुवतपणा, पक्षाघात उपचार केले जातील. अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ.रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन डॉ.अमित सुराणा, डॉ.अक्षय गादिया, डॉ.श्रीकांत दलाल, फिजिओथेरपीस्ट डॉ.अनुजा शिवणेकर–देशपांडे, डॉ.आराधना अरवडे, डॉ.अभय साठे रूग्ण तपासणी करतील.

२५ मार्च रोजी कान, नाक, घसा तपासणी शिबीर होईल. स्पिच थेरपी, तपासणी व मार्गदर्शन केले जाईल. ऑडिओमेट्री सुविधा उपलब्ध आहे. तज्ज्ञ डॉ.सुकेशिनी गाडेकर, डॉ.अतुल तुपे, वाचा व भाषा उपचार तज्ज्ञ डॉ. अझहर शेख, डॉ.सूरज कर्डिले रूग्ण तपासणी करतील.

२७ मार्च रोजी बालरोग तपासणी शिबीर होईल. नवजात शिशुंच्या सर्व आजारांवर निदान व उपचार, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, हर्निया, डायाफ्रामॅटिक हर्निया, फायमोसीस, हायड्रोसील, अर्नाडसेंडेड टेस्टिस तपासणी केली जाईल. बालरोग तज्ज्ञ डॉ.वैभवी वंजारे, डॉ.दीपी अग्रवाल, डॉ.विजय साठे, डॉ.गणेश गव्हाणे, पिडियाट्रिक सर्जन डॉ.रुपेश सिकची रूग्ण तपासणी करतील.

२९ मार्च रोजी मोफत नेत्ररोग तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर होईल. भगवान महावीर भवन येथील आनंदऋषीजी नेत्रालयात हे शिबीर होईल. शिबिरात नाव नोंदणीसाठी संपर्क : ८६८६४०१५१५. नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.अशोक महाडिक, डॉ.संदीप राणे, डॉ.प्रतिक कटारिया, डॉ.विशाल तांबे, डॉ.किरण शिंदे, डॉ.नेहा भराडिया, डॉ.केतन राठोड, डॉ.विवेक पाऊलबुधे, डॉ.नलिनी गिते, डॉ.कौस्तुभ घोडके, डॉ.निरंजन पेहरे, डॉ.पूनम लंकेश्वर आदी नेत्रतज्ज्ञ रूग्ण तपासणी करतील.

३० मार्च रोजी दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबीर होईल. लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीवरील जागेचे, हर्निया शस्त्रक्रिया १० हजार रुपये, पित्ताशय काढणे १५ हजार रुपये, स्त्रीयांची गर्भ पिशवी काढणे हिस्ट्रोक्टॉमी १० हजार रुपये, स्टॅपलर/ लेझर पाईल्स शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, अ‍ॅपेंडिक्स शस्त्रक्रिया ४ हजार रुपये, स्त्रियांचे बिजांडकोशावरील गाठी शस्त्रक्रिया ५ हजार रुपये, गर्भ नलिकेची ट्युबल पेटेन्सी २ हजार रुपये, लॅप्रोस्कोपी स्त्रियांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ३ हजार रुपयात करण्यात येईल. औषध व आयसीयु खर्च वेगळा असेल. लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. भास्कर जाधव, डॉ.. महेश घुगे, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ. सोनल बोरूडे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

या महाआरोग्य शिबिरांचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६. मो. ९४०४३९९९११



पारगाव येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये सैनिकी वेशात सहभागी झालेले विद्यार्थी.

# शिक्षणाबरोबर संस्कारही महत्वाचे : दिपक लांडगे

नगर – शाळेत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाबरोबर पालकांनी विद्यार्थ्यांना संस्कार देखील दिले पाहिजेत, असे प्रतिपादन वाघेश्वरी मिल्क प्रक्रिया उद्योग समुहाचे अध्यक्ष दिपक लांडगे यांनी व्यक्त केले.

पारगाव येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव प्रा. विजय शिंदे, उपाध्यक्ष अशोक शिंदे, ईश्वर तनपुरे, संपत गुंड, तानाजी गुंड, शाम लांडगे पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

लांडगे पुढे म्हणाले कि पालकांनी देखील विद्यार्थांना वेळ देणे गरजेचे आहे. वेळेची हि गुंतवणूक म्हणजे आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य चांगले जाण्याची हमी आहे. यावेळी विविध स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना लांडगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

प्रा. शिंदे यांनी प्रास्ताविक तसेच शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी विद्यार्थ्यांनी गणेशवंदना, पोवाडा, लावणी, देशभक्तीपर गीते यावर बहारदार सादरीकरण केले. तसेच रॅम्प वॉक करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमासाठी दिपाली त्रिमुखे, प्रिती कुमटकर यांनी नियोजन केले तर सहदेव शिर्के, नवनाथ इंगोले यांनी सहकार्य केले.

# शिक्षक भारतीच्या जिल्हा संघटकपदी प्रा. प्रविण काळे, तर महिला सचिवपदी प्रा. वंदना जाधव




नगर – शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी जिल्हा कार्यकारिणीच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये अहिल्यानगर जिल्हा संघटक म्हणून प्रा. प्रविण विठ्ठल काळे आणि जिल्हा महिला सचिव म्हणून प्रा. श्रीमती वंदना अरुण जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शिक्षक भारतीचे संस्थापक आमदार कपिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी या निवडी जाहीर केल्या आहेत. प्रा. प्रविण काळे हे श्री मुलाकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निघोज (ता. पारनेर) येथे कार्यरत असून त्यांची निवड जिल्हा संघटक (उच्च माध्यमिक विभाग) म्हणून करण्यात आली आहे. तर, राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, कोळपेवाडी (ता. कोपरगाव) येथील प्रा. वंदना जाधव यांची जिल्हा महिला सचिव (उच्च माध्यमिक विभाग) पदी वर्णी लागली आहे.

# इफ्तार पार्टी म्हणजे हिंदू मुस्लिम एकतेचं प्रतीक

### डॉ. इकराम काटेवाला यांचे प्रतिपादन; जमात ए इस्लामीतर्फे इफ्तार कार्यक्रम उत्साहात




हातमपुरा येथील जुन्या कलेक्टर ऑफिस शेजारील कासिमखानी मस्जिद रविवारी सायंकाळी सर्व धर्म सदभावाच्या भावनेतून दावते रोजा इफ्तार कार्यक्रम उत्साहात झाला. विविध धर्मीय बांधव या कार्यक्रमास उपस्थित होते.

नगर – रमजान हा आत्म शुद्धी, संयम आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र महिना असून रोजा केवळ भूक–तहान सहन करण्यासाठी नसून माणसाने आपल्या वागणुकीत चांगुलपणा, सहनशीलता आणि बंधुभाव वाढवण्यासाठी आहे, असे प्रतिपादन डॉ. इक्राम काटेवाला यांनी केले.

हातमपुरा येथील जुन्या कलेक्टर ऑफिस शेजारील कासिमखानी मस्जिद रविवारी सायंकाळी सर्व धर्म सदभावाच्या भावनेतून दावते रोजा इफ्तार कार्यक्रम उत्साहात झाला. विविध धर्मीय बांधव या कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन सावित्री फातिमा सद्भावना मंच नगर, जमात–ए–इस्लामी हिंद तसेच स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उद्देश समाजात बंधुभाव, ऐक्य व परस्पर सलोखा वाढवणे हा होता. सध्या देशात हिंदू मुस्लिम या दोन समाजात तेढ निर्माण करून तरुणांची माथी भडकावून त्यांना दंगली करण्यासाठी प्रवृत्त केलं जाण्याचा प्रयत्न होतोय. मात्र आपण आपल्या घरातील तरुणांना यापासून दूर ठेवलं पाहिजे, खऱ्या अर्थानं आज देशाला सावित्री – फातेमा व छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांची गरज आहे आणि तेच काम या संस्थेच्या वतीने सुरू आहे, असे उद्गार अनेकांनी काढले.

यावेळी डॉ. इक्राम काटेवाला आपल्या भाषणात म्हणाले की, रमजान हा आत्मशुद्धी, संयम आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र महिना असून रोजा केवळ भूक–तहान सहन करण्यासाठी नसून माणसाने आपल्या वागणुकीत चांगुलपणा, सहनशीलता आणि बंधुभाव वाढवण्यासाठी आहे.

यावेळी नगरसेवक बाळासाहेब बोराटे म्हणाले की, दावते इफ्तारसारखे कार्यक्रम समाजात प्रेम, बंधुभाव आणि एकता वाढवण्याचे काम करतात. सर्व धर्मीय लोकांनी एकत्र येऊन सण–उत्सव साजरे करणे ही आपल्या देशाची परंपरा असून अशा उपक्रमांमुळे समाजात परस्पर विश्वास आणि सलोखा अधिक दृढ होतो असे सांगितले.

संजय सपकाळ यांनी स्टुडन्ट इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, समाजात एकता आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सावित्री फातिमा सद्भावना मंच, नगर, जमात–ए–इस्लामी हिंद तसेच स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया च्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला हा दावते इफ्तार कार्यक्रम सर्व धर्मीयांना एकत्र आणणारा आदर्श उपक्रम असून अशा कार्यातून समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक बाळासाहेब बोराटे, नगरसेवक शम्स खान, माजी नगरसेवक फय्याज शेख (केबलवाले), साहेबांन जहागीरदार, हरदिन मॉर्निंग ग्रुप भिंगारचे अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, सावित्री फातिमा विचार मंचाचे अ‍ॅड. बोरुडे व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सर्व सदस्य यांच्यासह शहरातील सर्व धर्मीय धर्मगुरू, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील नेते, कार्यकर्ते आणि हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते. कार्यक्रमात विविध धर्मीय नागरिक व युवक सहभागी झाले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी आयोजकांनीपरिश्रम घेतले.

सुत्रसंचालन मुश्ताक पठाण यांनी केले. फिरोज शेख यांनी आभार मानले.



फिनिक्स क्रिकेट टर्फ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत स्टार क्रिकेट क्लब प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरला.

# फिनिक्स टर्फ आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत स्टार क्रिकेट क्लब प्रथम, सायली ट्रान्सपोर्ट द्वितीय

नगर – भिंगार येथील फिनिक्स टर्फ मैदानावर आयोजित करण्यात आलेली टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा पार पडली. स्थानिक क्रीडाप्रेमी, युवक व नागरिकांच्या उपस्थितीत रंगलेल्या या स्पर्धेला खेळाडू आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेत एकूण २८ संघांनी सहभाग नोंदवला होता. साखळी व बाद फेरीतील सामने अत्यंत चुरशीचे झाले. अंतिम सामन्यात स्टार क्रिकेट क्लब (संघ अ) आणि सायली ट्रान्सपोर्ट (संघ ब) यांच्यात थरारक लढत पाहायला मिळाली. उत्कृष्ट संघभावना आणि दमदार खेळाच्या जोरावर स्टार क्रिकेट क्लबने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले. विजेत्या संघाला रु. २१,००० रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांक सायली ट्रान्सपोर्ट संघाने मिळवला. त्यांना रु. ११,००० रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. तृतीय क्रमांक स्कॉड सेव्हन संघाने पटकावला असून त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे आयोजन फिनिक्स टर्फ चे संचालक प्रज्वल जितेंद्र भिंगारदिवे यांच्या वतीने करण्यात आले होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी परिश्रम घेतले. उत्कृष्ट नियोजन, पंचांचे सहकार्य आणि खेळाडूंच्या क्रीडाभावामुळे स्पर्धा निर्विघ्न पार पडली. बक्षीस वितरण समारंभासाठी नगरसेवक सुरेश बनसोडे, जितेंद्र भिंगारदिवे, सुहास दिवर, प्रदीप भिंगारदिवे, स्त्रुजन भिंगारदिवे तसेच मित्रपरिवार उपस्थित होते.

यावेळी प्रज्वल भिंगादिवे म्हणाले या स्पर्धेमुळे परिसरातील तरुणांना आपले क्रीडा कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली. भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणावर स्पर्धांचे आयोजन करण्याचा आमचा मानस आहे.



जुनी वसंत टॉकीज चौक परिसरात संगम तरुण मंडळाच्या वतीने यंदा इंदोरच्या धर्तीवर तब्बल पाच हजार एक गोवऱ्यांची आकर्षक होळी प्रज्वलित करण्यात आली.

# संगम तरुण मंडळाची ५००१ गोवऱ्यांची होळी

नगर – जुनी वसंत टॉकीज चौक परिसरात संगम तरुण मंडळाच्या वतीने यंदा इंदोरच्या धर्तीवर तब्बल पाच हजार एक गोवऱ्यांची आकर्षक होळी प्रज्वलित करण्यात आली. विशेष म्हणजे या होळीसाठी केवळ गोवऱ्यांचाच वापर करण्यात आला असून कोणत्याही लाकडाचा वापर न करता पारंपरिक पद्धतीने ही होळी उभारण्यात आली होती.

होळी प्रज्वलनाचा कार्यक्रम मंत्रोच्चारांच्या गजरात व भक्तिमय वातावरणात पार पडला. परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच बालगोपाळांनी उपस्थित राहून होळीचे दर्शन घेतले.

संगम तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अनेक दिवसांच्या परिश्रमातून ही होळी साकारली होती. मंडळाचे मार्गदर्शक नगरसेवक दत्तात्रय कावरे, मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश कावरे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन संगम तरुण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडले.

# साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानकडून पारंपरिक पद्धतीने होळी दहन



साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानकडून वसंत टेकडी येथे पारंपरिक पद्धतीने होळी दहन करण्यात आले.

नगर – साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने वसंत टेकडी येथे साईबाबा मंदिरासमोर होळी दहनाचा कार्यक्रम उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने झाला. परिसरातील महिला, युवक व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विधीवत पूजनाने करण्यात आली. उपस्थितांच्या हस्ते होळीचे पूजन करून वाईट प्रवृत्तींचा नाश होऊन समाजात सुख, शांती व ऐक्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने होळी प्रज्वलित करण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणाने दुमदुमून गेला.

याप्रसंगी महिला बालकल्याण समिती सदस्य व नगरसेविका सौ. रोशनी त्र्यंबके, माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, आकाश त्र्यंबके, योगेश पिंपळे, दिपाली कुडिया, जगताप सर, निलेश पालवे, तसेच साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

सुनील त्र्यंबके म्हणाले की, होळी हा सण वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवणारा सण आहे. समाजातील मतभेद, द्वेष आणि गैरसमज दूर करून सर्वांनी एकोप्याने आणि बंधुभावाने राहणे आवश्यक आहे. साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठान नेहमीच समाजहिताचे उपक्रम राबवत असून पुढील काळातही विविध सामाजिक कार्यांद्वारे नागरिकांच्या सेवेत राहील. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप प्रसाद वितरणाने करण्यात आला.

# महिला दिनानिमित्त आयएमएस-सीडसीतर्फे ‘आदिशक्ती’ स्पर्धा व महिला प्रदर्शन उत्साहात




अहिल्यानगर येथे अंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने आय एम एस सिडसी व इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आदिशक्ती – पौराणिक स्त्रीशक्तीचा उत्सव या संकल्पनेवर आधारित फॅन्सी ड्रेस स्पर्धा तसेच दोन दिवसीय महिला प्रदर्शनाचा समावेश होता.

नगर – अहिल्यानगर येथे अंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने आय एम एस सिडसी व इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आदिशक्ती – पौराणिक स्त्रीशक्तीचा उत्सव या संकल्पनेवर आधारित फॅन्सी ड्रेस स्पर्धा तसेच दोन दिवसीय महिला प्रदर्शनाचा समावेश होता.

फॅन्सी ड्रेस स्पर्धेत २० वर्षांवरील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध पौराणिक स्त्री पात्रांचे प्रभावी सादरीकरण केले. प्रत्येक स्पर्धकाने साकारलेल्या पात्रामागील प्रेरणा आणि त्या स्त्रीचे सामर्थ्य यांची सुंदर मांडणी केली. परीक्षकांच्या निर्णयानुसार सौ. वर्षा अष्टेकर यांनी साकारलेले लक्ष्मणाची पत्नी उर्मिला यांचे रूप विशेष ठरले आणि त्यांना प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले.

द्वितीय पारितोषिक सौ. प्राची पाठक (होलीका) यांना, तर तृतीय पारितोषिक सौ. आसावरी नातू (अन्नपूर्णा) यांना प्रदान करण्यात आले. तसेच तुळजाभवानीच्या वेशातील संस्कृती पाटील या विशेष आकर्षण ठरल्या असून त्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ श्री जय आनंद महावीर युवक मंडळचे अध्यक्ष शैलेश मुनोत व विस्तारा इव्हेंटचे प्रतीक देवराव यांच्या हस्ते झाला.

यावेळी शैलेश मुनोत यांनी सीडसीच्या उपक्रमांचे कौतुक करत अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधून महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, असे मत व्यक्त केले. तसेच भविष्यात सीडसीबरोबर विविध उपक्रम राबविण्याची ग्वाही दिली.

प्रतीक देवराव यांनीही सीडसीच्या कार्याचे कौतुक करत आयएमएसला सातत्याने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

तत्पूर्वी आयएमएसचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी स्वागत केले.

कार्यक्रमास श्री जय आनंद महावीर युवक मंडळाचे सचिव आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, विस्तारा इव्हेंट्सच्या प्रतिनिधी डॉ. नेहा शिंदे, प्रा. गौरी पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांनी केले. दरम्यान, दोन दिवसीय महिला प्रदर्शनात २५ हून अधिक स्टॉल्सद्वारे साड्या, दागिने, हँडीक्राफ्ट, बेकरी पदार्थ तसेच विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

# गोंडस नाही, धोक्याची घंटा! बाललठ्ठपणाकडे दुर्लक्ष करू नका

जागतिक लठ्ठपणा दिन दरवर्षी ४ मार्च रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लठ्ठपणाच्या वाढत्या समस्येकडे लक्ष वेधणे आणि प्रतिबंध व योग्य उपचारांविषयी जनजागृती करणे हा आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीत बालपणीचा लठ्ठपणा ही वेगाने वाढणारी गंभीर आरोग्य समस्या बनली आहे. पूर्वी गुटगुटीत म्हणजे तंदुरुस्त असा समज होता; परंतु आता संशोधन स्पष्ट सांगते की बाललठ्ठपणा हा पुढील आयुष्यातील मधुमेह, उच्च रक्तदाब, यकृतातील चरबी वाढणे आणि हृदयविकार यांचा पाया ठरू शकतो.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5) नुसार भारतात पाच वर्षांखालील सुमारे ३.४% मुले जादा वजनाची आहेत आणि ही संख्या झपाट्याने वाढत आहे. जागतिक स्तरावरही सुमारे २० कोटी शालेय मुले लठ्ठ असल्याचा अंदाज आहे. मागील दोन ते तीन दशकांत बाललठ्ठपणाच्या प्रमाणात तब्बल २४ पट वाढ नोंदली गेली आहे. त्यामुळे वेळेत ओळख आणि प्रतिबंध अत्यंत महत्त्वाचा आहे.

**बाललठ्ठपणा म्हणजे काय?**

✻ ०–५ वर्षे: उंचीनुसार वजन ठराविक मर्यादेपेक्षा जास्त

✻ ५–१८ वर्षे: शरीर वस्तुमान निर्देशांक (BMI) वापरून निदान

म्हणूनच प्रत्येक मुलाचे उंची, वजन, शरीर वस्तुमान निर्देशांक (BMI) आणि पोटाचा घेर नियमित मोजून वाढ नोंदपत्रावर (ग्रोथ चार्ट) नोंद ठेवणे अत्यावश्यक आहे.

**बाललठ्ठपणाची प्रमुख कारणे**

१. अयोग्य आहार सवयी

✻ जंक फूड, तळलेले पदार्थ, पॅकेज्ड खाऊ, साखरयुक्त पेये

✻ सहा महिन्यांपूर्वी बाळाचे स्तनपान बंद करणे, पूरक आहार खूप लवकर सुरू करणे

✻ बालपणी अनावश्यक किंवा जास्त प्रमाणात कृत्रिम दूध (फॉर्म्युला फीड) देणे

✻ जन्मावेळी वजन कमी (SGA) असलेल्या बाळांना जास्त भरवणे

✻ तंतुमय पदार्थ कमी व ट्रान्स–फॅट जास्त असलेला आहार

२.शारीरिक हालचालींचा अभाव

✻ मोबाईल, दूरदर्शन, व्हिडिओ खेळ यांचा जास्त वापर

✻ मैदानी खेळ कमी होणे

✻ बसून राहण्याची जीवनशैली

३. अपुरी झोप

झोप कमी झाल्यास भूक नियंत्रित करणाऱ्या हॉर्मोन्सचे संतुलन बिघडते.

४.आनुवंशिक घटक

कुटुंबात लठ्ठपणा असल्यास मुलांमध्ये धोका अधिक असतो.

५. हार्मोनल (संप्रेरक) समस्या – क्वचित पण महत्त्वाच्या

✻ थायरॉईड विकार

✻ वाढीच्या संप्रेरकाची कमतरता (ग्रोथ हार्मोन डेफिशियन्सी)

✻ कुशिंग सिंड्रोम

६.दीर्घकाळ चालणारी काही औषधे

स्टिरॉईड औषधे, काही फिट्स थांबवण्यासाठी दिली जाणारी औषधे किंवा मानसिक विकारांवरील औषधे

**त्वरित तपासणी आवश्यक असलेली धोक्याची चिन्हे**

✻ खूप लहान वयात झपाट्याने वजन वाढणे

✻ उंची कमी पण वजन जास्त असणे

✻ असामान्य जास्त भूक

✻ डोकेदुखी, उलट्या, झटके, दृष्टी तक्रारी

✻ विकासात उशीर किंवा चेहऱ्यात/शरीररचनेत वैशिष्ट्यपूर्ण बदल

✻ लैंगिक विकासात विलंब

✻ अशा वेळी लहान मुलाच्या हॉर्मोनल विकाराच्या तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**बाललठ्ठपणाचे दुष्परिणाम**

✻ इन्सुलिन प्रतिकार आणि टाइप २ मधुमेह

✻ रक्तातील चरबी (कोलेस्टेरॉल)वाढणे

✻ उच्च रक्तदाब

✻ यकृतातील चरबी वाढणे

✻ मुलींमध्ये पॉलिसिस्टिक अंडाशय विकार

✻ लवकर पौगंडावस्था

✻ सांधेदुखी

✻ घोरणे व झोपेत श्वास अडथळा

✻ आत्मविश्वास कमी होणे, चिंता, नैराश्य

**व्यवस्थापन :**

‘५–२–१–०’ नियम

५ – दररोज किमान ५ वेळा फळे व भाज्या, २– स्क्रीनसमोरचा वेळ दिवसाला २ तासांपेक्षा कमी, १– किमान १ तास शारीरिक हालचाल, ० – साखरयुक्त पेये पूर्णपणे बंद

**झोप :** योग्य झोपेची सवय आणि पुरेशी झोप अत्यावश्यक.

औषधोपचार व शस्त्रक्रिया

✻ औषधे निवडक आणि मोठ्या वयाच्या मुलांमध्येच

✻ अतिगंभीर स्थूलतेमध्ये निवडक रुग्णांत शस्त्रक्रिया विचारात घेतली जाते.

मात्र बहुतेक मुलांमध्ये जीवनशैलीतील बदल हेच मुख्य उपचार आहेत.

**पालकांसाठी महत्त्वाचे संदेश**


✻ प्रत्येक भेटीत उंची, वजन, BMI आणि पोटाचा घेर मोजा आणि वाढ नोंदपत्र जतन करा

✻ उंची कमी + वजन जास्त हे धोक्याचे चिन्ह

✻ विनापरवाना औषधे व स्टिरॉईडचा वापर टाळा

✻ प्रतिबंधाची सुरुवात गर्भावस्थेपासून करा

बालपणी लागलेल्या सवयी आयुष्यभर टिकतात. गोंडसपणामागे लपलेला धोका वेळेत ओळखला तर बाललठ्ठपणा मोठ्या प्रमाणात टाळता येतो. चला, या जागतिक लठ्ठपणा दिनी आपल्या मुलांना सक्रिय, तंदुरुस्त आणि निरोगी भविष्य देण्याचा संकल्प करूया.



**– डॉ. भक्ती कटारिया–दुगड, बाल हार्मोन विकार तज्ञ, नाशिक क्लिनिक, अहिल्यानगर, मो. ९०२८१५९३५९ (दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी चंगेडिया मेडिकल शेजारी माळीवाडा, अहिल्यानगर येथे भेट)**

# अहिल्यानगर जिल्ह्यामधील गायींचा मृत्यू हा चिंतेचा विषय

### तातडीने मदत आणि संशोधनाची पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



गायींच्या मृत्यूविषयी चर्चा करताना डॉ. पोपटराव पवार आदी.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील हिवरे बाजार, दैठणे गुंजाळ आणि टाकळी खातगाव या परिसरातील गायींना एका अज्ञात आजाराने ग्रासले असून, गेल्या काही दिवसांत सुमारे ३० गायींचा मृत्यू झाला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन आदर्श गाव संकल्प समितीचे कार्याध्यक्ष डॉ. पोपटराव पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे साकडे घातले आहे. या निवेदनाच्या प्रती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, प्रधान सचिव डॉ. रामास्वामी एन. आणि पशुसंवर्धन आयुक्त प्रवीण देवरे यांनाही माहितीसाठी आणि कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना ७५% नुकसान भरपाई मिळावी आणि या आजाराचे तातडीने सखोल संशोधन व्हावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

हिवरे बाजार (ता. नगर), दैठणे गुंजाळ (ता. पारनेर) आणि टाकळी खातगाव या ५ किमी परिघातील गावांमध्ये गायींच्या मृत्यूचे सत्र सुरू आहे. पशुसंवर्धन विभागाचे पथक, पुणे येथील तज्ज्ञ डॉक्टर आणि जिल्हा प्रशासनाने घटनास्थळी भेटी देऊन रक्ताचे नमुने, चारा, पाणी आणि शवविच्छेदनाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले आहेत. मात्र, अद्याप या आजाराचे नेमके निदान होऊ शकलेले नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

**डॉ. पोपटराव पवार यांच्या प्रमुख मागण्या : नुकसान भरपाईत वाढ :** सध्या जिल्हा परिषदेकडून केवळ १० हजार रुपये मदत मिळते, जी उपचारासाठीही अपुरी आहे. एका गायीची किंमत १ ते १.५ लाख रुपये असल्याने, शासनाने किमान ७५% नुकसान भरपाई द्यावी., आजाराचे तातडीने संशोधन : पिकांवरील तणनाशके, रासायनिक खतांचा अतिवापर आणि खाद्यातील युरिया यामुळे चारा विषबाधा होत आहे का? याची कृषी व पशुसंवर्धन विद्यापीठामार्फत तातडीने तांत्रिक चाचणी व्हावी.

**विमा निकषात शिथिलता :** केवळ बँक कर्ज असलेल्या जनावरांनाच विमा मिळतो, हा नियम बदलून सर्व जनावरांसाठी अल्पदरात विमा योजना सुरू करावी. तोपर्यंत दूध सोसायट्यांच्या पावत्या ग्राह्य धरून मदत द्यावी.

**शासकीय आदेशाची गरज :** पशुपालक पूर्णपणे दूध व्यवसायावर अवलंबून असल्याने, मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिक लक्ष घालून तातडीने मदतीचे आदेश द्यावेत., शेतकरी आधीच संकटात आहे, त्यात दुभत्या जनावरांचा असा मृत्यू होणे हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी घातक आहे. शासनाने याकडे युद्धपातळीवर लक्ष द्यावे.

# सातत्य, मेहनतीतून मोती निर्मिती

**कोल्हापूर जिल्ह्यातील दिलीप कांबळे यांनी पारंपरिक शेतीच्या पलीकडे जाऊन उत्पन्नाचा एक वेगळा मार्ग निवडला आणि मोती फार्मिंगमधून दरमहा ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचा यशस्वी प्रयोग केला. नोकरी सांभाळत त्यांनी सुरू केलेला व्यवसाय अडचणीचा ठरत होता, मात्र सातत्य, मेहनत आणि योग्य प्रशिक्षणाच्या जोरावर त्यांनी आज निर्यात दर्जाचे मोती तयार करण्यापर्यंत मजल मारली आहे.**

**अचिव्हर**

कांबळे यांना २०१५ साली ऑनलाइन माध्यमातून मोती फार्मिंगची माहिती मिळाली. या क्षेत्रात महाराष्ट्रात फारच कमी लोक कार्यरत असल्याचे लक्षात येताच त्यांनी ही संधी ओळखली.

२०१६ मध्ये त्यांनी नागपूर येथे प्राथमिक प्रशिक्षण घेतले, मात्र अपूर्ण माहिती आणि अनुभवाअभावी सलग तीन वर्षे त्यांना अपयशाला सामोरे जावे लागले, तरी त्यांनी कधीही हार मानली नाही.



अपयशानंतरही खचून न जाता कांबळे यांनी ओडिशातील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेशवॉटर ॲक्वाकल्चर (सीआयएफए) येथे सखोल प्रशिक्षण घेतले. योग्य तांत्रिक ज्ञान मिळाल्यानंतर त्यांनी २०१९ मध्ये नव्या पुन्हा जोमाने सुरुवात केली. सुरुवातीला ५,००० ऑयस्टरपासून शेती सुरू करत त्यांनी पुढे १८,५०० ऑयस्टरपर्यंत प्रकल्प वाढवला आणि यश त्यांच्या पायाशी आले.

२०२१ हे वर्ष कांबळे यांच्या आयुष्यात निर्णायक ठरले. याच काळात त्यांना पहिला निर्यात दर्जाचा, आकर्षक आकाराचा मोती मिळाला. परदेशी बाजारात या मोत्यांना प्रचंड मागणी असून, एका मोत्यामागे ३०० ते ५०० रुपये दर मिळू लागला. हा देशांतर्गत बाजारपेठेपेक्षा जवळपास तिप्पट होता. साधारण १०० रुपयांची गुंतवणूक करून ते थेट ३०० ते २,००० रुपयांपर्यंत कमाई करू लागले.

आर्थिक स्थैर्य मिळाल्यानंतर कांबळे यांनी स्वतःचे तलाव उभारून उत्पादन वाढवले. आज ते विविध आकारांचे आणि उच्च प्रतीचे मोती तयार करतात. त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी आहे; मात्र निर्यातीसाठी मोती जागतिक दर्जाचे असणे अत्यावश्यक



आहेत.

कांबळे यांनी केवळ स्वतःपुरते यश मर्यादित न ठेवता इतरांनाही या व्यवसायाकडे वळवले आहे. २०१९ पासून आतापर्यंत त्यांनी सुमारे शेकडो शेतकऱ्यांना मोती फार्मिंगचे प्रशिक्षण दिले आहे. सध्या देशभरात त्यांच्या मार्गदर्शनाखाली १५ मोती फार्मिंग प्रकल्प कार्यरत आहेत. निर्यातीमधून मिळणाऱ्या भरघोस नफ्यामुळे त्यांनी पूर्णपणे या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे.

# पुन्हा जडेल का प्रेम?

**मॅच मेकिंग**

मी २८ वर्ष वयाचा सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुण आहे. तीन वर्ष मी एका मुलीच्या प्रेमात होतो. आमचं ब्रेक अप होऊन तीन वर्ष लोटली. ती तिच्या दुसऱ्या मित्रासोबत लिव्ह इनमध्ये राहू लागली. आमचा यानंतर कोणताही संपर्क नाही. मी या धक्क्यातून सावरलो असलो तरी अजून कोणाच्या प्रेमात पडू शकलेलो नाही. मी मुलींशी गप्पा मारतो. त्यांच्यासोबत बाहेरही जातो. पण कमिटमेंटची खूप भीती वाटते. घरच्यांनी लग्नाचा तगादा लावला आहे. मी लग्नानंतर प्रेमात पडू शकेन का? मार्गदर्शन करा.



उत्तर : प्रेम ही संकल्पनाच अनोखी आहे. प्रत्येकाच्या दृष्टीने प्रेमाचा अर्थ वेगवेगळा असू शकतो. तू सध्या कोणतीही कमिटमेंट देण्याच्या तयारीत नाहीस. जुन्या नात्यांमधल्या आठवणी आपल्याला पुढे जाऊ देत नाहीत. तुझंही असंच होत असावं. पण मित्रा, तुला यातून बाहेर पडावं लागेल. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तू स्वत:ला वेळ दे. स्वयंविकासावर लक्ष केंद्रित कर. आवडीच्या गोष्टींमध्ये मन रमव. छंद जोपास. यामुळे तुला आयुष्यातल्या उद्दिष्टांची नीट कल्पना येईल. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घे. भविष्याची काळजी करू नकोस. तुला नक्कीच सुयोग्य जोडीदार मिळेल आणि तुमच्यात खूप चांगलं नातंही निर्माण होईल. यासाठी तुला समोरच्यावर पूर्ण विश्वास ठेवायला हवा.

# जोश

## फंडू एसएमएस


* हम जलते नहीं जलाते हैं, कुछ इसी अंदाज में जिंदगी बीताते हैं।

* एक बात बोलूं– कुछ यादे कुछ बातें,कुछ लोग और उनसे बने रिश्ते, कभी भुलाए नहीं जा सकते।

* अच्छा लगता है जब कोई कहता है, कोई बात नहीं, मैं हूं तुम्हारे साथ।

## भटकंती

### ट्रेकिंगसाठी पेमगिरी



इतिहासप्रेमी असाल आणि शहाजीराजे भोसले यांचा वारसा अनुभवायचा असेल तर नगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील पेमगिरी किल्ल्याला नक्की भेट द्यायला हवी. हा किल्ला फक्त इतिहासच सांगत नाही, तर निसर्गाच्या कुशीत लपलेला असल्यामुळे ट्रेकिंग साहस आणि निसर्गरम्य दृश्यांचा अद्भुत अनुभव देतो.

पेमगिरी किल्ला शहाजीराजे भोसले यांच्या काळातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक ठिकाण मानले जाते. १६३३ ते १६३६ या काळात शहाजीराजांनी निजामशाहीवर नियंत्रण मिळवण्यासाठी या किल्ल्यावरून स्वतंत्र राज्यकारभार चालवला. किल्ल्याच्या पडक्या तटबंदी, चोर दरवाजा, प्राचीन मंदिरे आणि विशाल वटवृक्ष पाहताना त्या काळातील शौर्य आणि सांस्कृतिक वारसा जाणवेल. हा किल्ला शाहगड म्हणूनही ओळखला जातो.

किल्ल्याची वैशिष्ट्ये

स्थान: पेमगिरी किल्ला संगमनेर– अकोले रस्त्यावरील कळस गवळाजवळ आहे.

प्राचीन मंदिरे: किल्ल्यावर प्राचीन पेमादेवी मंदिर आहे. स्थानिक लोक त्याला अत्यंत पवित्र मानतात.

निसर्गरम्य वटवृक्ष: किल्ल्याजवळ एक विशाल वटवृक्ष आहे.

अवशेष आणि भिंती: किल्ल्यावर पडक्या तटबंदीचे अवशेष, चोर दरवाजा आणि पाण्याची कोरडी टाकी पाहायला मिळतात.

पेमगिरी किल्ला छोटा डोंगरी किल्ला आहे, पण ट्रेकिंगसाठी उत्तम लोकेशन आहे. किल्ल्याजवळच्या पायऱ्यांवर चढताना निसर्गसौंदर्य, हिरवळीचा शाश्वत अनुभव आणि शहराचे अप्रतिम दृश्य पाहायला मिळते. किल्ल्यावरून दिसणारा नजारा खरोखरच थक्क करणारा आहे. सुट्टीत ट्रेकिंगसाठी, कुटुंबासोबत किंवा मित्रमैत्रिणीसोबत येणे एक अविस्मरणीय अनुभव ठरेल.

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेत बदलांची शक्यता

**इंटर्नशिप**

देशातील तरुणांना कॉर्पोरेट क्षेत्राशी जोडण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेत मोठे बदल होण्याची शक्यता आहे. सरकार कालावधी आणि वयोमर्यादेत कपात करण्याचा विचार करत असून, याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ शकतो.

सूत्रांच्या माहितीनुसार, योजनेच्या सुरुवातीच्या दोन पायलट टप्प्यांतील अनुभव लक्षात घेता सरकारला अपेक्षित प्रमाणात तरुणांचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे योजनेच्या रचनेत सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या योजनेचा विशेष उद्देश टॉप पाचशे कंपन्यांमध्ये १२ महिन्यांची प्रात्यक्षिक प्रशिक्षण (इंटर्नशिप) संधी देणे हा आहे. सध्या २१ ते २४ वयोगटातील युवक या योजनेसाठी पात्र आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा पाच हजार रुपये स्टायपेंड आणि सहा हजार रुपयांची एकरक्कमी मदत दिली जाते.


दिलेल्या ऑफर्स बऱ्याच तरुणांनी स्वीकारल्या नाहीत किंवा मध्येच इंटर्नशिप सोडली. एकूण ऑफर्सपैकी केवळ ३३ टक्के ऑफर्स स्वीकारल्या गेल्या, तर प्रत्यक्ष जॉइन करणाऱ्यांचे प्रमाण फक्त सहा टक्के इतकेच आहे.

तज्ज्ञांच्या मते, स्टायपेंड रक्कम, इंटर्नशिपचा कालावधी, कामाची जागा आणि भविष्यातील करार याबाबत स्पष्टता नसल्याने तरुणांचा या योजनेतील रस कमी झाला. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने व्यय वित्त समितीकडे प्रस्तावित बदलांचा अहवाल सादर केला आहे. सरकार सुधारित आराखडा प्रथम पायलट स्वरूपात सुमारे एक लाख प्रशिक्षणार्थ्यांसोबत तपासण्याचा विचार करत आहे.



## फॅशन पॅशन

### उन्हाळ्यासाठी योग्य फॅब्रिक



उन्हाळ्याचा विचार केला, तर हलके आणि श्वास घेण्यायोग्य फॅब्रिक्स या हंगामासाठी आदर्श आहेत. हे कपडे उत्कृष्ट आराम देतात आणि निर्विवादपणे स्टायलिश असतात. उन्हाळ्याच्या हंगामासाठी येथे पुरुषांसाठी काही कपडे आवश्यक आहेत.

कॉटन शर्ट – पुरुषांच्या कपड्यांसाठी कॉटन शर्ट हा सर्वात लोकप्रिय पर्याय आहे. ते दररोज घालता येतात. कॉटन फॅब्रिक अत्यंत आरामदायक असते. कॉटन शर्ट, जीन्स किंवा ट्राउझर्ससोबत घालणे चांगले. या फॅब्रिकपासून बनवलेले शर्ट कॅज्युअल आणि फॉर्मल दोन्ही वातावरणात घालता येतात.

कॅज्युअल वेअरसाठी टी–शर्ट सर्वोत्तम आहेत

टी–शर्ट उन्हाळ्याच्या हंगामासाठीदेखील परिपूर्ण आहेत. त्यांना जीन्स किंवा इतर बॉटम्ससोबत जोडल्याने एक स्मार्ट लूक येतो. ते आरामदायी आणि स्टायलिश असतात.

लिनन शर्ट – पुरुषांच्या कपड्यांमध्ये लिनन शर्ट हा एक आरामदायी आणि स्टायलिश पर्याय मानला जातो. त्यांच्या हलक्या आणि श्वास घेण्यायोग्य फॅब्रिकमुळे हे शर्ट उन्हाळ्यातील उन्हात आणि आर्द्रतेतही थंड आणि आरामदायी राहतात. उन्हाळ्यात बॉटम वेअरसाठी शॉर्ट्स हा सर्वात आरामदायी आणि स्टायलिश पर्याय आहे. तुम्ही हे कॅज्युअल वेअर म्हणून घालू शकता. हलक्या फॅब्रिकपासून बनवलल्यो शॉर्ट्स रोजच्या पोशाखासाठी सर्वोत्तम आहेत. त्या खूप स्टायलिशदेखील दिसतात आणि थंड आणि कॅज्युअल लूकसाठी निवडले जाऊ शकतात.

बॉटम वेअरसाठी ट्राउझर्स सर्वोत्तम

उन्हाळ्याच्या हंगामासाठी हलके, श्वास घेण्यायोग्य आणि सैल–फिटिंग ट्राउझर्स हा एक चांगला पर्याय आहे. तुम्ही हे ट्राउझर्स दररोज घालू शकता. ऑफिससाठी फॉर्मल ट्राउझर्स सर्वोत्तम आहेत.

# चटपटीत लेमन राईस

**झटपट रेसिपी**

मित्रांनो, रात्रीच्या जेवणात भाताची डिश करायची तर खिचडीऐवजी चविष्ट लेमन राईस ट्राय करा. करायला अगदी सोपी अशी ही रेसिपी तुमची भूक नक्कीच भागेल.



साहित्य : एक वाटी तांदूळ, एक लिंबू, २ ते ३ लाल सुक्या मिरच्या, राई, पाव चमचा उडिद डाळ, अर्धा चमचा चणा डाळ, चमचाभर भाजलेले दाणे, कढीपत्ता, अर्धा चमचा हळद, चवीनुसार मीठ, चमचाभर तेल, सजावटीसाठी किसलेलं गाजर(पर्यायी)

कृती : तांदूळ धुवून मोकळा भात करून घ्या. भात एखाद्या ताटात पसरून ठेवा. वाटीत लिंबाचा रस काढून घ्या. कढईत चमचाभर तेल गरम करा. त्यात मोहरी घाला. तडतडल्यावर चणा आणि उडिद डाळी घालून परतून घ्या. त्यात दाणे, लाल मिरच्या आणि कढीपत्ता घालून हलवा. हळद घालून गॅस बंद करा.त्यात लिंबाचा रस आणि मीठ घाला. लगेचच शिजवलेला भात घालून नीट हलवून घ्या. गरजेप्रमाणे मीठ आणि लिंबाचा रस घाला. त्यावर किसलेलं गाजर, कोथिंबिर घालून सजवा.हा भात दोन दिवस टिकतो. त्यामुळे परीक्षेच्या दिवसात लेमन राईस करून ठेवता येईल.

# डिनर डेटला जाताना...

**स्टायलिंग फंडे**

मित्रांनो, व्हॅलेंटाईन डेला किंवा त्यासुमारास खास व्यक्तीसह डेटिंगला जायचा प्लॅन असेल तर थोडी तयारी करायला हवी. अनेकजण प्रेमाच्या या दिवशी पहिल्यांदाच डेटिंगला जाणार असतील. त्यासाठी जोरदार तयारी सुरू असेल. पण दोस्तहो, अशा वेळी तुमचा अवतारही नीट असायला हवा. उगाचच काही तरी घालून डेटवर जाऊ नका. डेटला जाताना फॅशनच्या कोणत्या चुका टाळायच्या याविषयी...

* अशा वेळी जीमचे कपडे अजिबात घालू नका. ते फक्त जीममध्येच घालायचे असतात हे लक्षात ठेवा. तुमची मैत्रीण खूप छान तयारी करून आली असेल. या प्रसंगी तुमची जोडी शोभून दिसायला हवी. त्यामुळे जीमचे कपडे कितीही लाडके असले तरी ते बाजूला ठेवा.



* शर्टचं बटण उघडं ठेऊ नका. लो नेकवाले टी शर्ट टाळा. बटण खूप खाली असलेले शर्टही नकोच.

* सँडल्स आणि सॉक्स अजिबात कॅरी करू नका. सॉक्समुळे पायांना घाम आल्याने दुर्गंधी येऊ शकते. त्यामुळे सगळीकडे मंद सुगंध दरवळत असताना, प्रेमाचं गोडगुलाबी वातावरण असताना असले प्रयोग अजिबात करू नका.

* लोगो किंवा स्लोगन्सवाल्या टी शर्टचा ट्रेंड असला तरी डिनर डेटला असा टी शर्ट घालू नका. एखाद्यावर स्वत:ची छाप पाडताना ही फॅशन उपयोगी पडत नाही. एखाद्या ब्रँडचं नाव किंवा स्लोगन तुमची ओळख ठरणार नाही याची काळजी घ्या.

# स्मार्टफोन हॅक झाला तर...

**टेक्नो टॉक**

आज स्मार्टफोन आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. केवळ बँकिंगच नाही, तर सोशल मीडिया आणि ऑफिसची सर्व कामे फोनद्वारे काही मिनिटांत होतात, तर वाढत्या सायबर गुन्हेगारीत तुमचा फोन हॅक झाला, तर तुमची वैयक्तिक माहिती, फोटो, पासवर्ड आणि बँक तपशील लीक होऊ शकतात. अनेकांना प्रश्न पडत असेल, की त्यांचा फोन हॅक झाला आहे की नाही हे कसे कळेल. तुमचा फोन हॅक झाला असेल तर मोबाईलमध्ये काही विशिष्ट गोष्टी दिसतात.

डिव्हाइस कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय नेहमीपेक्षा हळू चालत असेल, ॲप्स उघडण्यास जास्त वेळ घेत असेल किंवा वारंवार हँग होत असेल, तर ते मालवेअर किंवा स्पाय ॲपचे संकेत असू शकते. हो बॅकग्राउंडमध्ये चालणारे अज्ञात ॲप्स तुमचा डेटा चोरू शकतात.

फोन हॅक होतो तेव्हा संशयास्पद ॲप्स बॅकग्राउंडमध्ये सतत सक्रिय राहतात. त्यामुळे बॅटरी जलद संपते. बॅटरीची स्थिती चांगली असेल, पण चार्जिंग लवकर संपत असेल तर तुम्ही प्रथम तुमचा बॅटरी वापर तपासला पाहिजे.

तुमच्या डिव्हाइसवर तुम्ही इन्स्टॉल न केलेले ॲप्स दिसत असतील तर हे हॅकिंगचे एक मोठे लक्षण असू शकते. हॅकर्स रिमोट ॲक्सेसद्वारे तुमच्या फोनवर स्पायवेअर किंवा ट्रॅकिंग ॲप्स इन्स्टॉल करू शकतात आणि तुमच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवू शकतात.



तुमच्या फोनच्या ब्राउझरवर किंवा होम स्क्रीनवर वारंवार विचित्र पॉप–अप दिसत असतील किंवा वेबसाइट आपोआप उघडत असतील किंवा विचित्र जाहिराती दिसत असतील तर ती एक धोक्याची घंटा आहे. हे ॲडवेअर किंवा कोडमुळे असू शकते.

तुमच्या डिव्हाइसवरून ऑटोमेटेड मेसेज येत असतील किंवा तुमच्या कॉल लॉगमध्ये अज्ञात नंबर दिसत असतील तर ताबडतोब चौकशी करा. हॅकर्स तुमच्या संपर्कांना स्पॅम मेसेज पाठवत असतील किंवा ओटीपी चोरण्याचा प्रयत्न करत असतील.

तुमच्या स्मार्टफोनमध्ये या ५ वार्निंग साइन दिसत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमचा फोन हॅक झाल्याची ही लक्षणे असू शकतात.

# मशिन लर्निंगमधील संधी

**रोजगारसंधी**

मशिन लर्निंग हे कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रातील विकसित होणारे उपक्षेत्र आहे. या तंत्रज्ञानामुळे संगणक प्रणालींना डेटामधून शिकण्याची, नमुने ओळखण्याची आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय निर्णय घेण्याची क्षमता मिळते. पारंपरिक प्रोग्रॅमिंगच्या तुलनेत, मशिन लर्निंग प्रणाली अधिक डेटा उपलब्ध झाल्यास स्वत:ची कार्यक्षमता सातत्याने सुधारतात.

डिजिटल डेटामध्ये झालेली प्रचंड वाढ, संगणकीय क्षमतेतील प्रगती, क्लाऊड तंत्रज्ञान आणि इंटरनेटचा वाढता वापर यामुळे मशिन लर्निंगचा विस्तार झपाट्याने होत आहे. मशिन लर्निंगचे प्रमुख उपयोग ई–कॉमर्समधील शिफारस प्रणाली, चेहरा व आवाज ओळख तंत्रज्ञान, वैद्यकीय प्रतिमा विश्लेषण, बँकिंगमधील फसवणूक ओळख, शेअर बाजार अंदाज, स्वयंचलित वाहने, स्मार्ट सहाय्यक आणि औद्योगिक स्वयंचलन या सर्व क्षेत्रांत मशिन लर्निंगचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे.

माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, बँकिंग व वित्त, विमा, उत्पादन उद्योग, वाहननिर्मिती, कृषी, शिक्षण आणि शासकीय संशोधन संस्था या क्षेत्रांत मशिन लर्निंग तज्ज्ञांची मागणी आहे. मशिन लर्निंग इंजिनिअर, डेटा सायंटिस्ट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स इंजिनिअर, डेटा



ॲनालिस्ट, कॉम्प्युटर व्हीजन इंजिनिअर, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग इंजिनिअर, बिझनेस इंटेलिजन्स ॲनालिस्ट आणि रिसर्च सायंटिस्ट अशा विविध भूमिका उपलब्ध आहेत. या भूमिका डेटा प्रक्रिया, मॉडेल तयार करणे, अल्गॉरिदम सुधारणा आणि प्रणाली अंमलबजावणी यांवर आधारित असतात. विद्यार्थी कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा डेटा सायन्समधील बी.टेक., मशिन लर्निंगमधील एम.टेक. किंवा एम.एस. पदवी, तसेच आयआयटी, एनआयटी आणि सी–डॅक यासारख्या संस्थांचे डिप्लोमा अभ्यासक्रम करू शकतात. विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरूनही उद्योगस्नेही प्रशिक्षण उपलब्ध आहे.

पायथॉन प्रोग्रॅमिंग, सांख्यिकी व प्रायिकता, मूलभूत रेषीय बीजगणित आणि मशिन लर्निंग अल्गॉरिदमचे ज्ञान आवश्यक आहे.

मशिन लर्निंग हे केवळ संगणकशास्त्राच्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित नाही. यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य आणि इलेक्ट्रॉनिक्स शाखेतील अभियंते आपल्या क्षेत्रातील ज्ञानाला डेटा विश्लेषणाची जोड देऊन मशिन लर्निंगमध्ये करिअर करू शकतात. याचा उपयोग प्रिडिक्टिव्ह मेंटेनन्स, रोबोटिक्स आणि स्मार्ट उत्पादन प्रक्रियांमध्ये होतो. शैक्षणिक प्रकल्प, इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण आणि स्पर्धांमधील सहभाग यामुळे प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

नोकरी देणाऱ्या संस्था केवळ सैद्धांतिक ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कामाचा अनुभव अधिक महत्त्वाचा मानतात. उच्च शिक्षणाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंगमध्ये एम.एस. किंवा पीएच.डी. करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. विद्यापीठे, संशोधन संस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये संशोधन कारकिर्दीचे मार्ग खुले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलन आणि डेटा सायन्समधील सातत्यपूर्ण प्रगतीमुळे मशिन लर्निंग हे भविष्यातील महत्त्वाचे करिअर क्षेत्र ठरणार आहे.

